दैनिक
# हिंदू प्रकाशवार्ता
epaper.hinduprakashwarta.com
PRGI No.: MHMAR/25/A2358
Web portal : hinduprakashwarta.com
सत्याचा प्रकाश, राष्ट्रवादाचा प्रहरी
छत्रपती संभाजीनगर ❀ मंगळवार, दि. ३० जून २०२६ ❀ वर्ष : १ ❀ अंक : ७१ ❀ पाने : ४ ❀ किंमत : ४ रु. ❀ Email : hinduprakashvarta@gmail.com

### वाचवा : थायलंडमध्ये अडकलेल्या तरुणांचे बेहाल

**मुंबई :** परदेशात चांगल्या पगाराची नोकरी मिळवून देण्याचे आमिष दाखवून बीडमधील एका तरुणाला म्यानमार-थायलंड सीमेवरील कथित सायबर फसवणूक रॅकेटमध्ये अडकवल्याचा धक्कादायक प्रकार समोर आला आहे. या तरुणासह महाराष्ट्रातील २५ ते ३० जण आणि देशभरातील शेकडो तरुण अशाच प्रकारे फसल्याचा दावा करण्यात आला आहे. बीड जिल्ह्यातील नांदुरघाट येथील स्वप्निल काळुंके हा ग्राफिक डिझायनर असून त्याने सोशल मीडियावर परदेशातील नोकरीची जाहिरात पाहिली होती.


## पाहिजेत

श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी संभाजीनगर येथे 3 वर्ष अनुभव असलेल्या सिव्हिल इंजिनिअर च्या जागा भरणे आहे.इच्छुक उमेदवार यांनी ईमेल आयडी नंबर shrivaradconstructionco@gmail.comवर आपले अर्ज पाठवावे किंवा मोबाईल नंबर 9923104521/9226611011वर संपर्क साधावा.

कार्यालय : श्री वरद कन्स्ट्रक्शन कंपनी, नंबर 515,5वा माळा, वास्तू इलाईट स्क्वेअर बीड बायपास रोड छत्रपती संभाजी नगर येथे कार्यालयीन वेळेत समक्षात भेटावे.


# शहरात भर चौकाचौकांत छुप्या मार्गाने गुटखा, सुगंधी सुपारी आणि 'खर्रा' विक्री जोरात; FDA ची कारवाई फक्त नावापुरतीच?

हिंदू प्रकाशवार्ता । नितीन दांडगे

**छत्रपती संभाजीनगर :** अन्न व औषध प्रशासन (FDA) आणि पोलिसांनी मिळून गेल्या महिनाभरात राज्यभर विशेष मोहीम सुरू केल्याचा दावा केला असला, तरी प्रत्यक्षात जमिनीवरील परिस्थिती मात्र वेगळीच चित्र दर्शवत आहे. शहरांमधील मुख्य बाजारपेठा, शाळा-महाविद्यालयांचे परिसर आणि भर चौकाचौकांत गुटखा, सुगंधी तंबाखू, बार सुपारी मिश्रित तंबाखू आणि 'खर्रा' (मावा) यांची खुलेआम विक्री सुरू असल्याचे पाहायला मिळत आहे.

या पार्श्वभूमीवर, "प्रशासनाची कारवाई नक्की कोणासाठी आणि कशासाठी?" असा संतप्त सवाल नागरिकांमधून उपस्थित केला जात असून, FDA ची कारवाई फक्त नावापुरती आणि

-> पान 2 वर

शहरातील सुज्ञ नागरिकांकडून आता थेट यंत्रणेच्या हेतूवरच बोट ठेवले जात आहे. वरिष्ठ पातळीवरून आदेश सुटतात, कागदावर मोठ्या कारवाया दाखवल्या जातात, काही ठिकाणी छापे टाकून प्रसिद्धीही मिळवली जाते; मात्र स्थानिक पातळीवर मिळणाऱ्या गुटख्याच्या आणि सुगंधी सुपारीच्या पाकिटांना रोखण्यात स्थानिक अधिकाऱ्यांना अपयश येत असल्याचे स्पष्ट दिसत आहे.

\- राजू सुरडकर, नागरिक



"गुटखा आणि प्रतिबंधित अंमली पदार्थांविरोधातील कारवाई कुठेही थांबलेली नाही. अन्न व औषध प्रशासन (FDA) अत्यंत सतर्कतेने आपले काम करत असून, शहरात आणि जिल्ह्यामध्ये कारवायांचे सत्र सातत्याने सुरू आहे. छुप्या मार्गाने विक्री करणाऱ्यांवर आमचे बारीक लक्ष असून, पोलिसांच्या समन्वयाने पुढील काळात हे धाडसत्र अधिक तीव्र केले जाईल. नागरिकांना कुठेही अशी बेकायदेशीर विक्री आढळल्यास त्यांनी प्रशासनाशी संपर्क साधावा, दोषींवर कडक कायदेशीर कारवाई केली जाईल."

\- दयानंद पाटील
(सहाय्यक आयुक्त, अन्न व औषध प्रशासन विभाग)



### पाच विभागांचा समन्वय कागदावरच?

काही दिवसांपूर्वीच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी संघटित गुटखा रॅकेटविरोधात थेट 'मकोका' (MCOCA) लावण्याची घोषणा केली होती, तसेच FDA आयुक्त तुकाराम मुंढे यांनीही सर्व विभागांना कठोर कारवाईचे निर्देश दिले होते. या मोहिमेत खालील पाच प्रमुख विभागांचा समन्वय असल्याचा दावा करण्यात आला होता. FDA (अन्न व औषध प्रशासन), स्थानिक पोलिस व गुन्हे शाखा, जिल्हाधिकारी कार्यालय, जीएसटी (GST) विभाग, परिवहन विभाग (RTO) मात्र, एवढ्या मोठ्या यंत्रणा एकत्र काम करत असतानाही शहराच्या नाका-नाक्यावर गुटखा कसा पोहोचतो, हा सर्वात मोठा संशोधनाचा विषय बनला आहे. सर्व यंत्रणांचा हा संयुक्त दावा केवळ कागदी घोडे नाचवण्यापुरताच मर्यादित आहे की काय, अशी शंका घेण्यास आता वाव मिळत आहे.

## थोडक्यात वार्ता

### अवैध सावकारीविरोधी कायद्यात बदल करणार : सहकार मंत्री

**मुंबई :** राज्यातील बेकायदेशीर सावकारीला आळा घालण्यासाठी विद्यामान कायद्यात बदल केले जाणार असून, पाच वर्षांच्या शिक्षा कालावधीतही मोठी वाढ केली जाईल, अशी माहिती सहकार मंत्री बाबासाहेब पाटील यांनी सोमवारी विधानसभेत प्रश्नोत्तराच्या तासात दिली. आमदार सुलभा खोडके यांनी या विषयी उपस्थित केलेल्या प्रश्नाच्या चर्चेत आमदार कैलास पाटील, नाना पटोले, हरीश पिंपळे, हेमंत ओगले, विजय वडेट्टीवार यांनीही उपप्रश्न विचारले. त्यावर उत्तर देताना मंत्री पाटील म्हणाले, राज्यात गेल्या काही वर्षांपासून अवैध सावकारीच्या घटना वाढत चालल्या आहेत, याची गंभीर दखल राज्य सरकारने घेतली असून यासंदर्भातील कायद्यात बदल करण्याची तयारी सुरू करण्यात आली आहे. या कायद्या अंतर्गत दोषी आढळल्यास संबंधितांवर पाच वर्षांची शिक्षा करण्याची सध्या तरतूत असून ती वाढविण्यासंदर्भात विचार सुरु असल्याची माहिती त्यांनी दिली. तसेच, रोशन कुळे प्रकरणातील मुख्य सूत्रधार म्हणून नाव समोर आलेल्या दिवाकर निकुरेबाबत चौकशी करुन कारवाई करण्याचे आश्वासनही त्यांनी दिले.

### अनुसूचित जाती आरक्षणातील उपवर्गीकरणाविरोधात आज मोर्चा

**मुंबई :** अनुसूचित जाती (एससी) आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या मुद्द्यावरून राज्यातील राजकीय आणि सामाजिक वातावरण कमालीचे तापले असून, या प्रस्तावित उपवर्गीकरणाला तीव्र विरोध करण्यासाठी उद्या, मंगळवारी विधान भवनावर भव्य मोर्चा धडकणार आहे. या पार्श्वभूमीवर, अनुसूचित जातीच्या २७ आमदारांनी सोमवारी मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांची भेट घेऊन आपली नाराजी व्यक्त केली. आरक्षणातील उपवर्गीकरणाच्या निर्णयामुळे अनुसूचित जातींमध्ये फूट पडू शकते आणि समाजात अंतर्गत संघर्ष निर्माण होऊ शकतो, अशी भीती व्यक्त करत या २७ आमदारांनी मुख्यमंत्र्यांना संयुक्त स्वाक्षरीचे निवेदन सादर केले आहे. सर्व पक्षीय आरक्षण समन्वय समितीने या उपवर्गीकरणाच्या विरोधात आक्रमक भूमिका घेतली असून, माजी न्यायमूर्ती अनंत मनोहर बदर समितीचा अहवाल तात्काळ रद्द करण्यात यावा, अशी प्रमुख मागणी लावून धरली आहे. अनुसूचित जातींच्या उपवर्गीकरणाची (अ, ब, क, ड) प्रस्तावित प्रक्रिया तात्काळ स्थगित करून ती कायमस्वरूपी रद्द करावी, अशी मागणी आमदारांनी मुख्यमंत्र्यांसमोर मांडली. तसेच, माजी न्यायमूर्ती बदर समितीचा संपूर्ण अहवाल, 'बार्टी'चा अहवाल, सर्व मूळ आकडेवारी, संशोधन पद्धती, सर्वेक्षण अहवाल, बैठकींचे इतिवृत्त आणि शिफारशी सरकारने तात्काळ सार्वजनिक कराव्यात, अशी मागणी करत अहवाल सार्वजनिक केल्याशिवाय कोणतीही पुढील कार्यवाही करू नये, अशी भूमिका घेतली आहे.

### संत निवृत्तीनाथ महाराजांच्या पालखीचे पंढरपूरकडे प्रस्थान

**त्र्यंबकेश्वर :** त्र्यंबकेश्वर नगरी आज अक्षरशः विठूनामाच्या गजराने दुमदुमून गेली. "पुंडलिक वरदे हरी विठ्ठल... श्री ज्ञानदेव तुकाराम... निवृत्तीनाथ महाराज की जय..." अशा अखंड जयघोषात, टाळ-मृदंगाच्या निनादात आणि हजारो वारकऱ्यांच्या उपस्थितीत च्या पालखीचे पंढरपूरच्या दिशेने भक्तिमय वातावरणात प्रस्थान झाले. राज्यभरातून आलेल्या भाविकांमुळे संपूर्ण त्र्यंबकनगरी भक्तीच्या महासागरात न्हाऊन निघाल्याचे चित्र पाहायला मिळाले. आषाढी एकादशीच्या वारीसाठी निघालेली संत निवृत्तीनाथ महाराजांची पालखी हा त्र्यंबकेश्वरमधील अत्यंत महत्त्वाचा धार्मिक सोहळा मानला जातो. पहाटेपासूनच मंदिर परिसरात वारकऱ्यांची मोठी गर्दी झाली होती. हातात भगवे पताके, ओठांवर विठ्ठलनाम आणि टाळ-मृदंगाच्या तालावर नाचणारे वारकरी यामुळे संपूर्ण परिसर भक्तिरसात रंगून गेला होता. यंदा पालखीची मुख्य पूजा राज्याचे जलसंपदा मंत्री गिरीश महाजन आणि मनसे नेते अमित ठाकरे यांच्या हस्ते करण्यात आली. यावेळी अनेक मान्यवर, स्थानिक लोकप्रतिनिधी, प्रशासनातील अधिकारी आणि हजारो भाविक उपस्थित होते.

### टीईटी पेपरफुटीप्रकरणी दोषींवर 'मकोका' लावणार

**मुंबई :** महाराष्ट्र राज्य शिक्षक पात्रता परीक्षा (टीईटी) २०२६च्या पेपरफुटीचा प्रयत्न उघडकीस येताच, महायुती सरकारने तातडीने आणि अत्यंत कठोर पावले उचलली आहेत. या गैरप्रकारात सामील असलेल्या दोषींवर संघटित गुन्हेगारी नियंत्रण कायद्यांतर्गत (मकोका) कारवाई करण्यासाठी आवश्यक त्या कायदेशीर बदलांची चाचपणी केली जाईल, अशी ग्वाही शिक्षणमंत्री दादा भुसे यांनी आज विधानपरिषदेत दिली. याशिवाय, भविष्यात अशा घटनांना पूर्णपणे आळा घालण्यासाठी पुढील वर्षापासून टीईटीसह सर्व परीक्षा पूर्णपणे पारदर्शक आणि शिस्तबद्ध पद्धतीने ऑनलाईन घेण्यासाठी मुख्य सचिवांच्या अध्यक्षतेखाली एक उच्चस्तरीय समिती नेमण्यात येत असल्याची घोषणाही त्यांनी केली.

# केंब्रिज चौकात चक्काजाम: विनाअट सरसकट कर्जमाफीसाठी राष्ट्रवादी आक्रमक

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राज्यातील शेतकरी सध्या अवकाळी पाऊस, दुष्काळसदृश परिस्थिती, शेतीमालाचे घसरलेले भाव आणि वाढत्या उत्पादन खर्चामुळे प्रचंड आर्थिक संकटात सापडला आहे. या पार्श्वभूमीवर, शेतकऱ्यांना तातडीने आणि संपूर्ण दिलासा देण्यासाठी "विनाअट सरसकट कर्जमाफी" करण्यात यावी, या मुख्य मागणीसाठी राष्ट्रवादी काँग्रेस पक्ष (शरदचंद्र पवार) पक्षाच्या वतीने आज सकाळी शहरातील केंब्रिज चौकात भव्य 'रास्ता रोको' आंदोलन करण्यात आले.

या आंदोलनामुळे जालना-छत्रपती संभाजीनगर महामार्गावरील वाहतूक काही काळासाठी पूर्णपणे ठप्प झाली होती."सरकारने

-> पान 2 वर



### शेतकऱ्यांच्या मुख्य मागण्या काय आहेत?

सरसकट कर्जमाफी: कोणत्याही अटी व शर्ती न लावता राज्यातील सर्व शेतकऱ्यांचे कर्ज पूर्णपणे माफ करावे.

ठोस निर्णय घ्या, आश्वासनं नको: सरकारने आतापर्यंत केवळ आश्वासनांची गाजरे दाखवली आहेत, प्रत्यक्षात शेतकऱ्यांच्या हातात काहीही पडलेले नाही, त्यामुळे आता थेट अंमलबजावणी व्हावी.


शेतीमालाला हमीभाव: उत्पादन खर्चावर आधारित योग्य भाव शेतीमालाला मिळावा.

### प्रमुख नेत्यांची उपस्थिती आणि सरकारवर हल्लाबोल

आंदोलनाचे नेतृत्व आमदार रोहित पवार यांनी केले. या आंदोलनाला बळ देण्यासाठी पक्षाचे अनेक ज्येष्ठ नेते आणि खासदार मैदानात उतरले होते. खासदार सुप्रिया सुळे, निलेश लंके, शशिकांत शिंदे, माजी मंत्री राजेश टोपे, हर्षवर्धन सपकाळ, कल्याण काळे यांच्यासह पक्षाचे शेकडो पदाधिकारी आणि हजारो शेतकरी या आंदोलनात सहभागी झाले होते. आंदोलनस्थळी कार्यकर्त्यांनी आणि शेतकऱ्यांनी सरकारविरोधात जोरदार घोषणाबाजी करत परिसर दणाणून सोडला.

# नरसापूर अत्याचार प्रकरणी आरोपीला मरेपर्यंत फाशीची शिक्षा

## पीडितेच्या पालकांना अश्रू अनावर



**पुणे :** भोर तालुक्यातील नसरापूर येथे साडेतीन वर्षांच्या चिमुकलीवर अत्याचार करून तिची निर्घृण हत्या करणाऱ्या आरोपी भीमराव प्रभाकर कांबळे (वय ६५) याला विशेष न्यायालयाने फाशीची शिक्षा सुनावल्यानंतर पीडितेच्या आई-वडिलांनी भावनिक प्रतिक्रिया दिली. न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत करताना त्यांनी, "हा निकाल योग्य आहे, पण त्या नराधमाला प्रत्यक्ष फाशी दिली जाईल, तेव्हाच आमच्या मुलीला खऱ्या अर्थाने न्याय मिळाला असे आम्ही समजू," असे सांगितले.

गेल्या दोन महिन्यांपासून न्यायाची प्रतीक्षा करणाऱ्या कुटुंबासाठी हा दिवस अत्यंत भावनिक ठरला. न्यायालयात निकालाचे वाचन सुरू असताना पीडितेच्या आईला अश्रू अनावर झाले. माध्यमांशी बोलताना त्यांनी सांगितले की, न्यायालयाने कठोर शिक्षा सुनावल्याने दिलासा मिळाला असला, तरी अंतिम समाधान आरोपीला प्रत्यक्ष फाशीची शिक्षा झाल्यानंतरच मिळेल. त्यांनी पुढे विश्वास व्यक्त केला की, आरोपीने उच्च न्यायालयात किंवा इतर न्यायालयात अपील केले तरी त्याची शिक्षाच कायम राहील. "आम्हाला न्यायव्यवस्थेवर पूर्ण विश्वास आहे," असेही त्यांनी नमूद केले.

पीडितेच्या वडिलांनीही न्यायालयाच्या निर्णयाचे स्वागत केले. "या निकालामुळे समाजात स्पष्ट संदेश जाईल की, अशा अमानुष गुन्ह्यांना कायदा कधीही माफ करत नाही. कठोर शिक्षा मिळतेच," असे ते म्हणाले. तपासापासून न्यायालयीन प्रक्रियेपर्यंत पोलिसांनी आणि सरकारी वकिलांनी दिलेल्या सहकार्याबद्दल त्यांनी कृतज्ञताही व्यक्त केली.

# जिल्हा बँक निवडणुकीसाठी भाजपची मोर्चेबांधणी; प्रत्येक मतदारापर्यंत पोहोचण्याच्या सूचना

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी




**छत्रपती संभाजीनगर :** जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकेच्या आगामी निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर भाजपने निवडणूक तयारीला वेग देत नगरसेवकांची महत्त्वपूर्ण बैठक विभागीय कार्यालयात आयोजित केली. जिल्हाध्यक्ष किशोर शितोळे यांनी बैठकीत नगरसेवकांना निवडणुकीची रणनीती समजावून सांगत प्रत्येक मतदारापर्यंत प्रभावीपणे पोहोचण्याच्या सूचना दिल्या.

बैठकीत मतदारांची अचूक माहिती, त्यांच्याशी सातत्याने संपर्क, मतदानाच्या दिवशी मतदारांना मतदान केंद्रापर्यंत आणण्याचे नियोजन तसेच कार्यकर्त्यांच्या जबाबदाऱ्या यावर सविस्तर मार्गदर्शन करण्यात आले. संघटनात्मक ताकद आणि प्रभावी नियोजनाच्या जोरावर जिल्हा बँकेची निवडणूक जिंकण्याचा निर्धार यावेळी व्यक्त करण्यात आला.

यावेळी कॅबिनेट मंत्री अतुल सावे, मा. खासदार डॉ. भागवत कराड आणि महापौर समीर राजूरकर यांनीही कार्यकर्त्यांना मार्गदर्शन करत निवडणुकीत एकजुटीने काम करण्याचे आवाहन केले.

बैठकीस मनपा स्थायी समितीचे सभापती अनिल मकरिये तसेच नगरसेवक शिवाजी दांडगे, संजय चौधरी, दिलीप थोरात, जालिंदर शेंडगे, सुरेंद्र कुलकर्णी, राजू शिंदे, शंकर म्हात्रे, विजय औताडे, कैलास गायकवाड, राजगौरव वानखेडे, सागर निळकंठ आणि विक्रम पवार उपस्थित होते.

# कब्रस्तानाच्या जागेवरून राडा; MIM च्या नगरसेवकासह जमावावर गुन्हा दाखल

हिंदू प्रकाशवार्ता/(प्रतिनिधी)

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील ब्रिजवाडी भागातील उत्तरानगरीत कब्रस्तानासाठी जागा देण्याच्या मुद्द्यावरून मोठा वाद निर्माण झाला आहे. एका खासगी मालकीच्या जागेचे सिमेंट पोलचे कंपाउंड तोडून, शिवीगाळ व जीवे मारण्याची धमकी दिल्याप्रकरणी 'एमआयएम'चे माजी नगरसेवक काकासाहेब काकडे यांच्यासह १२ ते १५ जणांवर एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला आहे.

ही घटना शुक्रवारी (दि. २६ जून) घडली असून या घटनेमुळे परिसरात काही काळ तणावाचे वातावरण निर्माण झाले होते. शुक्रवारी (दि. २६ जून) ब्रिजवाडी येथील या जागेचे सिमेंट कंपाउंड काही जण तोडत असल्याची माहिती फिर्यादी अजय शिंदे यांना मिळाली. ते तातडीने घटनास्थळी पोहोचले असता, तेथे सुमारे १०० ते १५० जणांचा जमाव गोळा झाला होता. यावेळी अश्पाक शेख, रेहमान पटेल, आशिम शेख आणि त्यांच्या साथीदारांनी जागेचे नऊ सिमेंट पोल पाडून नुकसान केले. त्यावेळी उपस्थित नागरिकांनी समजूत घातल्यानंतर हा जमाव तेथून निघून गेला. मात्र, त्यानंतर काही वेळातच माजी नगरसेवक काकासाहेब काकडे यांच्यासह काही लोक पुन्हा त्या ठिकाणी आले आणि त्यांनी तेथील उर्वरित सर्व कंपाउंड पाडून टाकल्याचे फिर्यादीत नमूद करण्यात आले आहे.याप्रकरणी अजय रामराव शिंदे यांच्या तक्रारीवरून एमआयडीसी सिडको पोलीस ठाण्यात माजी नगरसेवक काकासाहेब काकडे, अश्पाक शेख, रेहमान पटेल, आशिम शेख यांच्यासह इतर १० ते १२ संशयित आरोपींवर गुन्हा दाखल करण्यात आला आहे. या घटनेचा पुढील तपास पोलीस करत असून, परिसरातील कायदा व सुव्यवस्था राखण्यासाठी पोलीस प्रशासनाने सतर्कता बाळगली आहे.

चिकलठाणा भागातील अशोकनगर (मसनतपूर) येथील रहिवासी आणि स्क्रॅप व्यावसायिक अजय रामराव शिंदे (वय ४३) यांनी याप्रकरणी पोलीस ठाण्यात फिर्याद दिली आहे. उत्तरानगरी भागात अजय शिंदे यांच्यासह जितेंद्र टाकळकर, सागर वल्लभबागला, नलीन सुराणा, विजय जैन, ऋतिक अग्रवाल आणि सुशील धूत यांच्या संयुक्त मालकीची एक खासगी जागा आहे. या संपूर्ण जागेला सुरक्षिततेसाठी सिमेंट पोलचे कंपाउंड घालण्यात आलेले आहे.

काही दिवसांपूर्वी या जागेवर काम सुरू असताना संशयित आरोपी अश्पाक शेख, रेहमान पटेल, आशिम शेख आणि त्यांच्या साथीदारांनी तेथे येत, "कब्रस्तानासाठी १० गुंठे जागा द्या, अन्यथा तुम्हाला येथे कोणतेही बांधकाम करू देणार नाही," अशी धमकी दिल्याचा आरोप तक्रारीत करण्यात आला आहे. त्यावेळी वाद अधिक वाढू नये म्हणून जमीन मालकांनी पोलिसांत तक्रार दिली नव्हती.

# 'विश्वास ज्वेलर्स'वर धाडसी दरोडा; शेटर तोडून 26 लाखांचे दागिने अन् रोख रक्कम लंपास

## सातारा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल; अज्ञात चोरट्यांचा शोध सुरु असून चांदीचे शेकडो जोड दागिने, कॅमेरा DVR आणि 2 लाखांची रोख रोकड चोरीला

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरातील सातारा पोलीस ठाण्याच्या हद्दीत एका नामांकित ज्वेलर्सच्या दुकानावर अज्ञात चोरट्यांनी धाडसी दरोडा टाकल्याची धक्कादायक घटना उघडकीस आली आहे. राहुलनगर मेन रोडवरील 'विश्वास ज्वेलर्स' या सोन्या-चांदीच्या दुकानाचे शेटर आणि लाकडी कपाटाचे कुलूप तोडून चोरट्यांनी तब्बल २६ लाख ४१ हजार रुपयांचे चांदीचे दागिने आणि रोख रक्कम लंपास केली आहे. याप्रकरणी सातारा पोलीस ठाण्यात अज्ञात चोरट्यांविरुद्ध गुन्हा दाखल करण्यात आला असून पोलीस यंत्रणा सतर्क झाली आहे. गणेश दिगंबरराव शेडुते (वय ३८, रा. बालाजीनगर, सातारा) यांचे राहुलनगर मेन रोडवर 'विश्वास ज्वेलर्स' नावाचे दुकान आहे. २६ जून रोजी रात्री ८.१५ वाजेच्या सुमारास ते नेहमीप्रमाणे दुकान बंद करून घरी गेले होते. त्यानंतर शनिवार आणि रविवारी दुकान बंद असल्याचा गैरफायदा घेत अज्ञात चोरट्यांनी मध्यरात्री दुकानाच्या शेटरचे कुलूप तोडून आत प्रवेश केला. २८ जून रोजी पहाटे ५.३० वाजेच्या सुमारास दुकानाच्या समोरील किराणा दुकानदार सईद यांनी फोन करून गणेश शेडुते यांना, "तुमच्या दुकानाचे शेटर उघडे दिसत आहे," अशी माहिती दिली. माहिती मिळताच शेडुते यांनी तातडीने दुकानात धाव घेतली. आत जाऊन पाहिले असता दुकानातील तिजोरी सुरक्षित होती, मात्र शेजारील लाकडी कपाट तोडलेले होते. त्या कपाटात ठेवलेले चांदीचे दागिने आणि प्लास्टिकच्या डब्यातील रोख रक्कम गायब असल्याचे त्यांच्या निदर्शनास आले. चोरटे सराईत असल्याचा संशय आहे, कारण आपली ओळख पटू नये म्हणून त्यांनी दुकानात लावलेल्या सीसीटीव्ही कॅमेऱ्याचा DVR आणि वायफाय यंत्रणा देखील सोबत चोरून नेली. या घटनेची माहिती मिळताच सातारा पोलिसांनी घटनास्थळाची पाहणी केली आहे. वरिष्ठ पोलीस अधिकाऱ्यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस उपनिरीक्षक गोविंद बबनराव एकीलवाले या गुन्ह्याचा पुढील तपास करत आहेत. भररस्त्यातील ज्वेलर्सच्या दुकानावर झालेल्या या मोठ्या चोरीमुळे शहरातील व्यापारी वर्गात भीतीचे वातावरण पसरले आहे.

### चोरीला गेलेल्या ऐवजाचा तपशील

**चांदीची चैनपट्टी (१०० जोड - ४ किलो):** ५,७५,००० रुपये
**चांदीचे पैंजण (३० जोड - ३ किलो):** ५,७५,००० रुपये
**लहान मुलांचे मोठे पैंजण (दीड किलो):** २,१०,००० रुपये
**लहान मुलांचे लहान पैंजण (२०० जोड):** ८,५०,००० रुपये
**लहान मुलांचे कडे, ब्रासलेट व चैन (१ किलो):** २,००,००० रुपये
**पुजेची लक्ष्मी-गणपती मूर्ती (५० ग्रॅम):** १३,००० रुपये
**रोख रक्कम (५०० च्या ४०० नोटा):** २,००,००० रुपये
**GCMOB कंपनीचा कॅमेरा, DVR आणि WiFi:** १८,००० रुपये

# संपादकीय

## निसर्गाचे वरदान आणि सतर्कतेचे आवाहन

भारतीय हवामान विभागाने मुंबईसह आसपासच्या संपूर्ण परिसरासाठी आगामी काही दिवसांचा हवामान अंदाज जाहीर केला असून, संपूर्ण कोकण किनारपट्टीवर जोरदार पावसाची शक्यता वर्तवली आहे. हवामान विभागाच्या अधिकृत अहवालानुसार, पुढील काही दिवस विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस आणि वादळी वारे वाहणार आहेत. पावसाच्या या इशाऱ्यामुळे प्रशासनाकडून किनारपट्टीवरील जिल्ह्यांमध्ये सर्व प्रकारच्या खबरदारीच्या उपाययोजना केल्या जात आहेत. मान्सूनच्या या सक्रियतेमुळे अनेक भागांतील पाण्याचे दुर्भिक्ष संपण्यास मदत होणार असली, तरी नागरिकांनी सुरक्षिततेच्या दृष्टीने योग्य ती काळजी घेणे गरजेचे आहे. पालघर जिल्ह्यात आगामी काही दिवसांत अत्यंत मुसळधार पाऊस आणि वेगवान वादळी वाऱ्यांचा इशारा देण्यात आला आहे. यासोबतच ठाणे आणि मुंबईमध्ये पुढील पाच दिवस मुसळधार ते अतिमुसळधार पावसाची शक्यता वर्तवण्यात आली आहे. या काळात विजांच्या कडकडाटासह प्रतितास चाळीस किलोमीटर वेगाने वारे वाहतील, असा अंदाज आहे. रायगड जिल्ह्यातही पुढील पाच दिवस जोरदार पावसाचा इशारा देण्यात आला असून, काही ठिकाणी अत्यंत रौद्र रूप पाहायला मिळू शकते. या मुसळधार पावसामुळे शहरांमधील सखल भागांत पाणी साचण्याची दाट शक्यता असल्याने, नागरिकांनी विनाकारण घराबाहेर पडणे टाळावे आणि प्रवास करताना विशेष खबरदारी घ्यावी, असे आवाहन हवामान विभागाकडून करण्यात आले आहे. दुसरीकडे, मराठवाड्यातील लातूर जिल्ह्याला या पावसाने मोठा दिलासा दिला आहे. गेल्या चोवीस तासांत जिल्ह्यात समाधानकारक पावसाची नोंद झाली आहे. रेणापूर तालुक्यात सर्वाधिक, तर देवणी तालुक्यात सर्वात कमी पाऊस झाला आहे. याशिवाय लातूर शहर, चाकूर, उदगीर, जळकोट, अहमदपूर, शिरूर अनंतपाळ, औसा आणि निलंगा या सर्वच भागांत पावसाच्या सरी बरसल्या आहेत. या पावसामुळे गेल्या अनेक दिवसांपासून जाणवणाऱ्या असह्य उकाड्यापासून नागरिकांना तात्काळ सुटका मिळाली आहे. मात्र, शेतीचा विचार करता अनेक भागांतील शेतकऱ्यांना अद्यापही पेरणीयोग्य अशा दमदार आणि मोठ्या पावसाची प्रतीक्षा कायम आहे. सोलापूर जिल्ह्यातील पंढरपूर तालुक्यात मात्र पावसाने अत्यंत दमदार हजेरी लावली आहे. चळे, आंबे, ओझेवाडी या संपूर्ण परिसरात पहाटेपासूनच पावसाने धुमाकूळ घातला. या मुसळधार पावसामुळे नदीकाठच्या परिसरातील अनेक ओढे आणि नाले ओसंडून वाहू लागले आहेत, तर अनेक शेतांमध्ये पाणी साचण्यास सुरुवात झाली आहे. पहिल्याच मोठ्या पावसात संपूर्ण शेतशिवार पाण्याने न्हाऊन निघाल्यामुळे आणि सर्वत्र पाणीच पाणी झाल्यामुळे बळीराजा कमालीचा सुखावला असून शेतीच्या कामांना आता वेग येणार असल्याचे चित्र दिसत आहे.

## केंब्रिज चौकात चक्काजाम: विनाअट सरसकट कर्जमाफीसाठी राष्ट्रवादी आक्रमक

पान 1 वरून ->

शेतकऱ्यांची फसवणूक केली आहे. कर्जमाफीच्या नावाखाली अनेक जाचक अटी घातल्यामुळे राज्यातील लाखो शेतकरी या लाभापासून वंचित राहिले आहेत. जोपर्यंत आमच्या मागण्या मान्य होत नाहीत, तोपर्यंत आम्ही आंदोलनावरून उठणार नाही!"खासदार निलेश लंके यांनी मत मांडले. आंदोलनाची भव्यता आणि केंब्रिज चौकातील वाढती गर्दी लक्षात घेता, प्रशासनाकडून आंदोलनस्थळी पोलिसांचा मोठा फौजफाटा तैनात करण्यात आला होता. कायदा व सुव्यवस्था बिघडू नये म्हणून पोलीस बारीक लक्ष ठेवून होते. संपूर्ण आंदोलन परिसरावर आणि वाहतूक कोंडीवर नियंत्रण ठेवण्यासाठी ड्रोन कॅमेऱ्यांचा वापर करून पोलिसांकडून विशेष व्हिडिओ फुटेज आणि पाळत ठेवली जात होती.

"शेतकऱ्यांच्या पाठीशी उभे राहणे हे सरकारचे कर्तव्य आहे, पण हे सरकार केवळ राजकारणात मग्न आहे," असा आरोप यावेळी रोहित पवार आणि उपस्थित नेत्यांनी केला. जर सरकारने या मागण्यांकडे तातडीने लक्ष दिले नाही, तर हे आंदोलन केवळ छत्रपती संभाजीनगरपुरते मर्यादित न राहता संपूर्ण राज्यभर तीव्र गतीने छेडण्यात येईल, असा राज्यव्यापी आंदोलनाचा इशारा राष्ट्रवादी काँग्रेसकडून (शरद पवार गट) देण्यात आला आहे.


**CHANGE OF NAME** हिंदू प्रकाशवार्ता

I, OLD NAME : PATHAN REHANKHAN ALTAFKHAN, Residing At Post Shivna.Tq.Sillod. Dist Chh.Sambhajinagar [431132], have changed my name to NEW NAME : PATHAN REHAN KHAN AFTAB KHAN and shall hereafter be known as NAME : PATHAN REHAN KHAN AFTAB KHAN for all purposes.

**CHANGE OF NAME** हिंदू प्रकाशवार्ता

I, OLD NAME : MUBASHIRA BEGUM SHAIKH MD MUSHTAQUE, Residing At Post Shivna.Tq.Sillod.Dist Chh. Sambhajinagar [431132], have changed my name to NEW NAME : MUBASSHIRA REHAN PATHAN and shall hereafter be known as NAME : MUBASSHIRA REHAN PATHAN for all purposes.


## श्रद्धा, सत्य आणि पारदर्शकता : विश्वास जपण्याची हीच खरी परीक्षा

### एक चिंतनपर लेख

**आजचे जग वेगाने बदलत आहे. माहिती काही क्षणांत संपूर्ण पृथ्वीवर पोहोचते. त्यामुळे कोणत्याही संस्थेची खरी ताकद केवळ तिच्या भव्य इमारतीत नसते; ती तिच्या सत्यनिष्ठा, पारदर्शकता, नैतिकता आणि लोकविश्वासात असते. विश्वास हा कोणत्याही संस्थेची सर्वात मोठी संपत्ती आहे; आणि त्याचे रक्षण हीच सर्वात मोठी जबाबदारी आहे.**

मानवजातीच्या इतिहासात श्रद्धा ही केवळ धार्मिक भावना नसून संस्कृतीची, सभ्यतेची, करुणेची, नैतिकतेची आणि मानवी ऐक्याची अखंड वाहणारी जीवनधारा आहे. मंदिर असो वा मशीद, चर्च असो वा गुरुद्वारा, विहार असो वा सभास्थान—प्रत्येक पवित्र स्थान हे दगड-विटांचे नव्हे, तर विश्वास, मूल्ये आणि मानवतेचे सजीव मंदिर असते. तेथे अर्पण होणारी प्रत्येक देणगी ही केवळ धनाची नव्हे; ती श्रद्धेची, प्रेमाची, कृतज्ञतेची आणि आशेची अमूल्य ठेव असते.

अशा पवित्र स्थळांच्या व्यवस्थापनासंदर्भात कोणत्याही प्रकारच्या अनियमिततेचे किंवा गैरव्यवहाराचे आरोप समोर आले की समाजमन अस्वस्थ होते. कारण ते केवळ आर्थिक प्रश्न नसतात; ते लोकांच्या विश्वासाशी जोडलेले असतात. अयोध्येतील श्रीराम मंदिरातील देणग्या आणि मौल्यवान वस्तूंच्या व्यवस्थापनाबाबत काही आरोप समोर आले असून संबंधित यंत्रणांनी चौकशी सुरू केली आहे. काहींवर कारवाई झाल्याच्या बातम्याही प्रसिद्ध झाल्या आहेत. तथापि, कोणताही आरोप हा न्यायालयीन आणि अधिकृत चौकशीपूर्वी अंतिम सत्य मानता येत नाही. निष्पक्ष तपास, पुरावे आणि न्यायव्यवस्थेचा अंतिम निर्णय यांचाच आदर करणे हे लोकशाहीचे आणि न्यायाचे मूलभूत तत्त्व आहे.

या घटनेतून मात्र संपूर्ण जगासाठी एक अत्यंत महत्त्वाचा संदेश मिळतो—श्रद्धा जितकी महान, तितकीच तिची व्यवस्था पारदर्शक, उत्तरदायी आणि प्रामाणिक असली पाहिजे.

विश्वास हा काचेसारखा असतो—घडायला वर्षे लागतात; तुटायला क्षण पुरतो. म्हणूनच प्रत्येक धार्मिक, सामाजिक, शैक्षणिक आणि सार्वजनिक संस्थेने आर्थिक व्यवहारांमध्ये पारदर्शकता, नियमित लेखापरीक्षण, आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर, स्वतंत्र देखरेख आणि उत्तरदायित्व यांना सर्वोच्च स्थान दिले पाहिजे. जिथे पारदर्शकता असते तिथे विश्वास फुलतो; जिथे प्रामाणिकता असते तिथे प्रतिष्ठा टिकते; जिथे उत्तरदायित्व असते तिथे समाज निश्चिंत राहतो.

आजचे जग वेगाने बदलत आहे. माहिती काही क्षणांत संपूर्ण पृथ्वीवर पोहोचते. त्यामुळे कोणत्याही संस्थेची खरी ताकद केवळ तिच्या भव्य इमारतीत नसते; ती तिच्या सत्यनिष्ठा, पारदर्शकता, नैतिकता आणि लोकविश्वासात असते. विश्वास हा कोणत्याही संस्थेची सर्वात मोठी संपत्ती आहे; आणि त्याचे रक्षण हीच सर्वात मोठी जबाबदारी आहे.

भगवान श्रीरामांच्या जीवनातून जगाने मर्यादा, न्याय, कर्तव्य, करुणा, त्याग आणि लोककल्याण यांचे अमूल्य धडे घेतले आहेत. म्हणून श्रीरामांचे नाव घेताना केवळ भक्तिभाव नव्हे, तर त्यांच्या आदर्शांचेही स्मरण झाले पाहिजे. रामत्व म्हणजे सत्य; रामत्व म्हणजे न्याय; रामत्व म्हणजे कर्तव्य; रामत्व म्हणजे सर्वांच्या कल्याणाची भावना.

आज जगाला अधिक उंच इमारतींची नव्हे, तर अधिक उंच मूल्यांची गरज आहे; अधिक संपत्तीची नव्हे, तर अधिक सचोटीची गरज आहे; अधिक प्रसिद्धीची नव्हे, तर अधिक विश्वासार्हतेची गरज आहे. कारण संपत्तीने संस्था मोठी होते; पण चारित्र्याने ती महान होते.

श्रद्धा जपा, सत्य जपा;
विश्वास जपा, विकास घडा.
सेवा फुलू दे, सद्भाव खुलू दे;
नीती रुजली की मानवता फुलू दे.
पारदर्शक व्यवहार, विश्वासाचा आधार;
प्रामाणिक विचार, समाजाचा सत्कार.
सत्याचा प्रकाश, न्यायाचा श्वास;
करुणेचा सुवास, मानवतेचा विकास.

ही घटना केवळ एका संस्थेची किंवा एका देशाची नाही; ती संपूर्ण मानवजातीसाठी आत्मपरीक्षणाची संधी आहे. प्रत्येक संस्था, प्रत्येक प्रशासन, प्रत्येक विश्वस्त आणि प्रत्येक नागरिकाने स्वतःला एक प्रश्न विचारला पाहिजे—आपल्याकडे सोपविलेल्या विश्वासाचे आपण किती प्रामाणिकपणे जतन करतो?

जेव्हा श्रद्धेला सचोटीची साथ मिळते, तेव्हा समाज समृद्ध होतो. जेव्हा सेवेला नीतिमत्तेची जोड मिळते, तेव्हा संस्था आदर्श बनतात. जेव्हा प्रशासनाला पारदर्शकतेचा आधार मिळतो, तेव्हा लोकशाही अधिक मजबूत होते. आणि जेव्हा न्यायाला सत्याची साथ मिळते, तेव्हा मानवतेचा विजय निश्चित होतो.

शेवटी, कोणत्याही घटनेचा उपयोग मतभेद वाढविण्यासाठी नव्हे, तर मूल्ये अधिक दृढ करण्यासाठी झाला पाहिजे. निष्पक्ष चौकशी, न्याय्य निर्णय, पारदर्शक व्यवस्था आणि नैतिक नेतृत्व हीच प्रत्येक श्रद्धास्थानाची, प्रत्येक संस्थेची आणि प्रत्येक राष्ट्राची खरी ओळख असली पाहिजे.

सत्य तेजस्वी राहो, न्याय जागृत राहो;
श्रद्धा निर्मळ राहो, सेवा अखंड राहो.
विश्वास अढळ राहो, मूल्ये अविचल राहो;
मानवता फुलत राहो, विश्वबंधुत्व नांदत राहो.

**- लेखक: पांडुरंग मारुती धुमाळ**

## कर्जमुक्ती प्रक्रियेला वेग : पात्र शेतकऱ्यांचा तपशील संकलनाची जबाबदारी बँकांवर निश्चित

राज्य शासनाने शेतकऱ्यांना दिलासा देण्यासाठी "पुण्यश्लोक अहिल्यादेवी होळकर शेतकरी कर्जमुक्ती योजना" जाहीर केली असून या योजनेचा लाभ ५६ लाख शेतकऱ्यांना मिळणार आहे. सुमारे ३६ हजार ५०० कोटी रुपयांच्या या योजनेमुळे महाराष्ट्रातील शेतकऱ्यांना मोठा आधार मिळणार आहे.

राज्यातील शेतकरी बांधवांना दिलासा देण्यासाठी जाहीर करण्यात आलेल्या या योजनेच्या प्रभावी अंमलबजावणीसाठी सहकार विभागाने कंबर कसली आहे. या योजनेची प्रभावी, पारदर्शक अंमलबजावणी आणि वेळेत लाभ देण्यासाठी सर्व व्यापारी बँका व जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांना सहकार विभागाकडून सविस्तर मार्गदर्शक सूचना देण्यात आल्या आहेत.

योजनेचा लाभ थेट आणि पारदर्शक पद्धतीने पात्र शेतकऱ्यांपर्यंत पोहोचवण्यासाठी बँकांकडून शेतकऱ्यांचा सविस्तर तपशील मागवण्यात येत आहे. बँकांना युद्धपातळीवर काम करण्याचे आदेश राज्य शासनाने दिले आहेत. या प्रक्रियेत कोणतीही त्रुटी राहू नये म्हणून बँकांना मुख्यालय आणि जिल्हा स्तरावर विशेष नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. या सूचनांनुसार पात्र शेतकऱ्यांची माहिती अचूक स्वरूपात संकलित करून पोर्टलवर अपलोड करण्यासह प्रत्येक टप्प्यावर समन्वयाची जबाबदारी बँकांवर निश्चित करण्यात आली आहे.

यासाठी प्रत्येक बँकेने मुख्यालय स्तरावर दोन नोडल अधिकाऱ्यांची नियुक्ती करणे बंधनकारक करण्यात आले आहे. यापैकी एक अधिकारी योजना अंमलबजावणी समन्वयक, तर दुसरा माहिती तंत्रज्ञान समन्वयक म्हणून काम पाहणार आहे. तसेच प्रत्येक जिल्ह्यात जिल्हाधिकारी व जिल्हास्तरीय समिती (DLC) यांच्याशी समन्वय राखण्यासाठी स्वतंत्र जिल्हा नोडल अधिकाऱ्याची नियुक्ती करण्याच्या सूचना देण्यात आल्या आहेत.

कर्जखात्यांचे दोन स्वतंत्र गट करण्यात आले आहेत. आधार क्रमांक उपलब्ध असलेली कर्जखाती आणि आधार क्रमांक उपलब्ध नसलेली कर्जखाती. ज्या खात्यांमध्ये आधार क्रमांक उपलब्ध नाही, अशा खात्यांची स्वतंत्र यादी तयार करून ती बँक शाखा, विकास संस्था तसेच गावपातळीवर प्रसिद्ध करण्यात येणार आहे. संबंधित शेतकऱ्यांना विविध माध्यमातून मोहीम राबवून शेतकऱ्यांचा आधार क्रमांक प्रमाणीकरण करण्याचे आवाहन केले जात आहे. यासाठी बँकांनी विशेष आधार-जोडणी मोहीम राबविण्याच्या सूचनाही देण्यात आल्या आहेत.

आधार क्रमांक उपलब्ध असलेल्या कर्जखात्यांची माहिती शासनाने दिलेल्या नमुन्यानुसार तयार करून पोर्टल तातडीने अपलोड करावी लागणार आहे. दि३० सप्टेंबर २०२५ रोजी थकीत असलेली आणि ३१ मार्च २०२६ पर्यंत परतफेड न झालेली वैयक्तिक व संयुक्त पीककर्ज खाती यामध्ये समाविष्ट करण्यात येणार आहेत.

संयुक्त कर्जखात्यांसाठी सर्व कर्जदारांचे आधार क्रमांक, आधार-जोडलेली बचत खाती तसेच प्रत्येकाचा कर्जातील हिस्सा नमूद करणे बंधनकारक करण्यात आले आहे. मयत कर्जदारांच्या प्रकरणांमध्ये वारसांची नोंद करून त्यानुसार लाभ वितरित करण्यात येणार आहे.

कर्जखात्यांची माहिती अपलोड करताना पोर्टलवरील निकषांचे पालन करणे आवश्यक राहील. त्रुटी आढळल्यास माहिती दुरुस्त करून पुन्हा अपलोड करावी लागणार आहे. आधार क्रमांक असलेल्या खात्यांची माहिती प्रथम अपलोड केली जाईल, तर नंतर आधार जोडणी झालेल्या खात्यांची माहिती पुढील टप्प्यांत स्वीकारली जाणार आहे.

माहितीची संगणकीय पडताळणी झाल्यानंतर गावनिहाय लाभार्थी यादी पोर्टलवर उपलब्ध होईल. ही यादी बँक शाखा व विकास संस्थांच्या नोटीस बोर्डवर प्रसिद्ध करण्यात येईल. त्यानंतर पात्र शेतकऱ्यांना आधार प्रमाणीकरणासाठी 'आपले सरकार सेवा केंद्र' किंवा संबंधित बँक शाखेत उपस्थित राहण्याबाबत संदेश पाठविण्यात येईल.

शेतकऱ्यांना यादीतील माहितीबाबत हरकत असल्यास ती थेट जिल्हास्तरीय तक्रार निवारण समितीकडे पाठविली जाईल. समितीच्या निर्णयानुसार संबंधित बँकांनी आवश्यक दुरुस्त्या करून माहिती अद्ययावत करणे बंधनकारक राहील.

आधार प्रमाणीकरण पूर्ण झाल्यानंतर व्यापारी बँकांच्या लाभार्थ्यांच्या कर्जखात्यात कर्जमाफीची रक्कम थेट जमा केली जाईल. जिल्हा मध्यवर्ती सहकारी बँकांनी ४८ तासांच्या आत संबंधित नोंदी अद्ययावत करून पोर्टलवर माहिती नोंदविणे आवश्यक राहील. कर्जमाफीची रक्कम जमा झाल्यानंतर सर्व लाभार्थी शेतकऱ्यांना कर्जमाफीचे प्रमाणपत्र देण्यात येणार आहे.

या संपूर्ण प्रक्रियेमुळे पात्र शेतकऱ्यांची अचूक ओळख, माहितीची पारदर्शक पडताळणी, तक्रार निवारणाची प्रभावी व्यवस्था आणि कर्जमाफीचा लाभ वेळेत पोहोचविणे शक्य होणार आहे या योजनेअंतर्गत दोन लाख रुपयांपर्यंतच्या अल्पमुदतीच्या पीक कर्जाची माफी करण्यात येणार आहे. थकीत, पुनर्गठित तसेच फेरपुनर्गठित कर्जांचाही यामध्ये समावेश करण्यात आला आहे. दोन लाख रुपयांपेक्षा किंचित अधिक कर्ज असलेल्या शेतकऱ्यांनाही लाभ मिळावा यासाठी विशेष तरतूद करण्यात आली असून शेतकऱ्यांनी स्वतःचा हिस्सा भरल्यानंतर शासन दोन लाख रुपयांपर्यंतची रक्कम त्यांच्या कर्जखात्यात जमा करणार आहे.

नियमित कर्जफेड करणाऱ्या शेतकऱ्यांना प्रोत्साहन म्हणून ५० हजार रुपयांपर्यंत प्रोत्साहन अनुदान देण्याची तरतूद करण्यात आली आहे. तसेच यापूर्वीच्या कर्जमाफी योजनांचा लाभ घेतलेल्या शेतकऱ्यांनाही या प्रोत्साहनपर लाभासाठी पात्र करण्यात आले आहे.

एकवेळ समजोता योजना (वन टाईम सेटलमेंट) प्रकरणांबाबतही शासनाने दिलासादायक निर्णय घेतला असून व्यापारी बँका, ग्रामीण बँका आणि सहकारी बँकांमधील पात्र शेतकऱ्यांना या योजनेचा लाभ मिळणार आहे. उर्वरित रक्कम भरण्यासाठी ३१ मार्च २०२७ पर्यंत मुदत देण्यात आली आहे.

अॅग्रीस्टॅकमध्ये नाव नसल्यामुळे कोणताही शेतकरी योजनेपासून वंचित राहणार नाही प्रथम नोंदणी करून त्यानंतर लाभ दिला जाणार आहे . आवश्यकतेनुसार विशेष मोहीम राबविण्यात येणार आहे.

योजनेच्या अंमलबजावणीसाठी राज्यातील सर्व बँकांकडील पात्र शेतकऱ्यांचा डेटा विशेष पोर्टलवर अपलोड करण्यात येत आहे. पात्र लाभार्थ्यांना यादीत स्वतंत्र युनिक क्रमांक देण्यात येणार असून ग्रामपंचायत, तलाठी कार्यालय तसेच ऑनलाइन पोर्टलवर यादी प्रसिद्ध करण्यात येणार . आधार प्रमाणीकरण आणि मोबाईल क्रमांक नोंदणीची प्रक्रिया पूर्ण झाल्यानंतर शासनाकडून थेट संबंधित शेतकरी बांधवांच्या कर्जखात्यात रक्कम जमा केली जाणार आहे .लवकरच थकबाकीदार शेतकऱ्यांच्या खात्यावर रक्कम जमा करण्याचा शासनाचा प्रयत्न असून त्यामुळे खरीप हंगामासाठी शेतकऱ्यांना नव्याने पीक कर्ज उपलब्ध होण्यास मदत होईल,

या योजनेचा उद्देश केवळ कर्जमुक्ती देणे नसून शेतकऱ्यांना आर्थिकदृष्ट्या सक्षम करणे, त्यांचा आत्मविश्वास वाढविणे आहे.

**-काशीबाई थोरात –धायगुडे**
**(वरिष्ठ सहायक संचालक)**

### मायेचा हात आणि शिक्षणाचा प्रकाश: वर्षभराच्या साहित्याचे कृतज्ञतापूर्वक वाटप!

## 'सेवापथ सोशल फाउंडेशन'तर्फे १०० अनाथ व एकलपाल्य विद्यार्थ्यांना शैक्षणिक दत्तक घेण्याचा स्तुत्य उपक्रम

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** "ज्या माऊलीच्या पदराखाली आभाळ कोसळलंय, जिने पतीच्या जाण्याने कोलमडलेल्या संसाराला आपल्या कष्टाच्या घामाने पुन्हा उभं केलंय... अशा कष्टकरी आईच्या पदराची ओढ आणि तिच्या डोळ्यांतील अश्रू पुसण्यासाठी 'सेवापथ'ने मायेचा हात पुढे केला आहे..."

सामाजिक बांधीलकी, आरोग्य, पर्यावरण, आणि रक्तदानाच्या क्षेत्रात आपल्या अहोरात्र सेवेने जनसामान्यांच्या हृदयात स्थान निर्माण करणाऱ्या 'सेवापथ सोशल फाउंडेशन' या संवेदनशील सामाजिक संस्थेने शैक्षणिक क्षेत्रात एक अत्यंत हृदयस्पर्शी आणि क्रांतीकारी पाऊल टाकले आहे. मागील दोन वर्षांपासून संस्थेने एका अशा अभिनव आणि भावुक उपक्रमाची सुरुवात केली आहे, ज्यामुळे अनेक अंधारलेल्या घरांमध्ये शिक्षणाचा दिवा पेटणार आहे. ज्या कोवळ्या जीवांचे वडील हयात नाहीत, ज्यांच्या डोक्यावरून पित्याचे छत्र हरपले आहे आणि ज्यांची आई कुठेतरी पडेल ते काम करून, अत्यंत हालखीत राहून आपल्या काळजाच्या तुकड्याला शिकवण्यासाठी रक्ताचे पाणी करत आहे... अशा अत्यंत



गरजू, गरिबीशी झगडणाऱ्या आणि प्रतिकूल परिस्थितीत जगणाऱ्या १०० एकलपाल्य विद्यार्थ्यांना सेवापथ सोशल फाउंडेशनने 'शैक्षणिक दत्तक' घेतले आहे. संस्थेचा उद्देश केवळ त्यांना पुस्तके देणे एवढाच नाही, तर त्यांच्या कोमेजलेल्या मनाला आशेचा पालवी फुटवणे हा आहे. या मुलांच्या व्यक्तिमत्त्वाचा विकास करून त्यांच्यातील सुप्त गुण, आत्मविश्वास आणि जीवनाची ध्येये जागृत करून त्यांना समाजात ताठ मानेने जगण्यास सक्षम बनवण्याचा विडा संस्थेने उचलला आहे. याच पवित्र ध्येयाचा एक भाग म्हणून, श्री तुळजा भवानी प्राथमिक व माध्यमिक शाळेत शिकत असलेल्या या चिमुरड्यांना वर्षभर लागणारे संपूर्ण शैक्षणिक साहित्य अत्यंत आदराने आणि मायेने सुपूर्द करण्यात आले. मुलांच्या चेहऱ्यावरील आनंद आणि त्यांच्या मातांच्या डोळ्यांतील कृतज्ञतेचे अश्रू पाहून उपस्थितांचेही हृदय भरून आले होते. या हृदयस्पर्शी साहित्य वाटप सोहळ्याला 'कॅन्डल फाउंडेशन' या नामांकित सामाजिक संस्थेचे सदस्य प्रामुख्याने उपस्थित होते, ज्यांनी आपल्या उपस्थितीने मुलांचा उत्साह द्विगुणित केला. कार्यक्रमाचे अध्यक्षपद संजय मलिक व विजय मलिक यांनी भूषवले. त्यांच्या मार्गदर्शनाने उपस्थित सर्वांनाच समाजसेवेची नवी प्रेरणा मिळाली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन माधुरी जाधव यांनी केले. त्यांच्या शब्दांनी उपस्थितांच्या मनाचा ठाव घेतला. कार्यक्रमाचा निरोप घेताना, शाळेच्या मुख्याध्यापिका नीलम वाघ यांनी अत्यंत भावूक होत, "अशा कठीण प्रसंगात आमच्या मुलांच्या पाठीशी खंबीरपणे उभे राहिल्याबद्दल" सेवापथ सोशल फाउंडेशनच्या संपूर्ण टीमचे शाळेच्या वतीने आणि पालकांच्या वतीने मनापासून आभार मानले.रामकिसन खर्डेकर, शिवाजी राईद, हरिभाऊ देशमुख, मयुर मोदे, अनिता येताळे, सचिन मलिक, विनोद सोनकांबळे, सरिता साळवे, तेजल पगारे-कांबळे, वैभव मवाळ, सय्यद नईम (अली), शेख जमील, सुभाष साळवे, मयुर मूगदल, शेख अब्दुल, असलम खान, सुशील पाटील, अब्दुल रहीम यांची उपस्थिती होती.

**खेळातूनच घडते सुंदर आयुष्य:** अध्यक्ष शेख अकबर

याप्रसंगी संस्थेचे अध्यक्ष शेख अकबर यांनी विद्यार्थ्यांना अतिशय जिव्हाळ्याचे मार्गदर्शन केले. ते म्हणाले, "शिक्षणाने बुद्धी प्रगल्भ होतेच, पण त्यासोबतच मैदानी खेळांचे महत्त्वही अनन्यसाधारण आहे. खेळ माणसाला लढायला आणि जिंकायला शिकवतो. पुस्तकी ज्ञानासोबत खेळातून मिळणारे आरोग्य आणि सांघिक भावना तुमच्या आयुष्याला अधिक सुंदर बनवेल." त्यांच्या या शब्दांनी मुलांमध्ये एक नवा आत्मविश्वास निर्माण केला.

## शहरात भर चौकाचौकांत छुप्या मार्गाने गुटखा, सुगंधी सुपारी

पान 1 वरून ->

कागदावरच मर्यादित आहे का? असा गंभीर प्रश्न आता निर्माण झाला आहे. "प्रशासनाकडून फक्त कोट्यवधींचा मुद्देमाल जप्त केल्याचे आकडे जाहीर केले जातात, पण रोज सकाळी टपऱ्यांवर मिळणारा गुटखा बंद होत नाही.

ही धडक मोहीम जर इतकीच गतिमान आहे, तर मग शहरात ठीक ठिकाणी दररोज सुगंधी तंबाखू आणि खरा कसा मिळतो?" तपासणीचा केवळ फार्स? चौकाचौकांत राजरोस विक्री होत असून राज्य सरकारने गुटखा आणि तंबाखूमिश्रित पदार्थांवर पूर्णपणे बंदी घातली असली, तरी शहरातील गल्लीबोळांपासून ते मुख्य चौकांपर्यंत या प्रतिबंधित पदार्थांचा पुरवठा अखंडित सुरू आहे. पानटपऱ्या आणि छोट्या दुकानांमध्ये सुगंधी सुपारी, सुगंधी तंबाखू आणि तंबाखूमिश्रित 'खरा' ग्राहकांना सहज उपलब्ध करून दिला जात आहे.

विशेष म्हणजे, ज्या चौकांमध्ये पोलिसांचा पहारा असतो किंवा प्रशासकीय अधिकाऱ्यांची ये-जा असते, तिथेही ही विक्री छुप्या आणि काही ठिकाणी अगदी राजरोसपणे सुरू आहे. त्यामुळे अन्न व औषध प्रशासनाचा धाक नेमका उरलाय कोणावर, अशी चर्चा रंगू लागली आहे. शहरात आणि त्यातही विशेषतः तरुण पिढीला विळखा घालणाऱ्या या सुगंधी तंबाखू व खऱ्याच्या विक्रीला चाप लावण्यासाठी केवळ 'नवा पुरस्कार' किंवा मोहिमांचे ढोल न वाजवता, प्रत्यक्ष मैदानात उतरून कठोर अंमलबजावणी करण्याची गरज आहे. अन्न व औषध प्रशासनाचे (FDA) स्थानिक अधिकारी या वाढत्या छुप्या विक्रीवर आता तरी ठोस कारवाई करणार की नेहमीप्रमाणे 'डोळेझाक' करणार, याकडे सर्वांचे लक्ष लागले आहे.

# विद्यापीठ निधीतून ११६ शिक्षकांची भरती

## 32 हजार एकत्रित वेतनावर जागा भरणार, उमेदवारांची होणार लेखी परीक्षा

**छत्रपती संभाजीनगर, दि.२९ :** डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात एकत्रित निधीतून वेतनावर विविध ३८ विभागात शिक्षकांची ११६ पदे भरण्यात येणार आहेत. ३० जून ते १५ जुलै या काळात ऑनलाईन आवेदन मागविण्यात आले असून उमेदवारांची लेखी परीक्षा. मुलाखती द्वारे पदे भरण्यात येणार आहेत, अशी माहिती कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांनी दिली.

डॉ.बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठात शिक्षक प्रवर्गातील २८९ शासन मान्य पदे असून १६० पदे सध्या रिक्त आहेत. प्राध्यापक, सहयोगी प्राध्यापक व सहायक प्राध्यापक प्रवर्गातील ७३ पदांसाठी सध्या भरती प्रक्रिया सुरु करण्यात आली आहे. तथापि रिक्त पदांची संख्या मोठी असल्याने एकत्रित वेतनावरी पदे भरण्याचा निर्णय व्यवस्थापन परिषदेने घेतला आहे. मा.कुलगुरु डॉ.विजय फुलारी यांच्या मार्गदर्शनाखाली गेल्या दोन वर्षात एकत्रित वेतनावर शिक्षकांची ११ महिन्यासाठी भरती करण्यात आली. सन २०२६-२७ या शैक्षणिक वर्षासाठी एकत्रित वेतनावर सहायक प्राध्यापकांची ११६ पदे भरण्यात येणार आहेत. यामध्ये छत्रपती संभाजीनगर येथील ३० विभाग, धाराशिव उपपरिसर येथील ७ विभाग व दिनदयाल उपाध्याय कौशल्य केंद्र अशा ३८ विभागात मिळून ११६ पदे भरण्यात येणार आहेत. ११ महिन्यासाठी भरण्यात येणा-या या शिक्षकांना ३२ हजार रूपये मासिक वेतन देण्यात येणार आहे. विद्यापीठ अनुदान आयोगाच्या समर्थ पोर्टलवरुन ऑनलाईन पध्दतीने आवेदन मागविण्यात आले असून यांची लिंक विद्यीपठाच्या संकेतस्थळावर देण्यात आली आहे. ३० जून ते १५ जुलै या काळात उमेदवारांना ऑनलाईन आवेदन दाखल करता येणार आहेत. तर २० जुलै पर्यंत कागदपत्रांसह दोन प्रतीत अस्थापना विभागात संबंधित उमेदवारांनी आवेदनाची 'हॉर्डकॉपी' पाठवावी. यानंतर लेखी परीक्षेची तारीख विद्यापीठाच्या संकेतस्थळावरून जाहीर करण्यात येईल, असे कुलसचिव डॉ.प्रशांत अमृतकर यांनी कळविले आहे.

**प्राध्यापक पदासाठी मुलाखती सुरू**

शिक्षक प्रवर्गातील ७३ जागांची भरती प्रक्रिया सध्या सुरु आहे. पहिल्या टप्प्यात प्राध्यापक प्रवर्गातील सात जागांसाठी २९ जून ते २ जुलै या दरम्यान मुलाखती घेण्यात येणार आहेत. यामध्ये सोमवारी (२९ जून ) प्राणीशास्त्र व पर्यावरणशास्त्र या विभागातील दोन जागांसाठी मुलाखती घेण्यात आल्या. तर ३० जून - वनस्पतीशास्त्र, १ जुलै - इतिहास व इंग्रजी, २ जुलै -हिंदी या प्रमाणे सहा विभागातील सात जागांसाठी मुलाखती घेण्यात येणार आहेत. एकुण ५१ उमेदवारांना मुलाखती पत्रे पाठविण्यात आली आहेत. संबंधित उमेदवारांची सकाळी ८ ते ११ या वेळेत कागदपत्रांची पडताळणी होऊन लगेच मुलाखती सुरु करण्यात येणार आहेत.

# राशनचे धान्य व तांदूळ घेऊन काळ्या बाजारात जाणाऱ्या वाहनासह आठ लाख 39 हजाराचा मुद्दे माल जप्त

हिंदू प्रकाश वार्ता /प्रतिनिधी



**परभणी:** परभणी शहरातुन गंगाखेड कडे अवैधरित्या काळा बाजारात विक्रीसाठी घेऊन जाणारा सार्वजनिक वितरण व्यवस्थेतील रेशनचा गहू व तांदूळ दैठना पोलिसांनी जप्त केला आहे. या कार्यवाहीत सुमारे आठ लाख 39 हजार 600 रुपयांचा मुद्देमाल हस्तग त करण्यात आला असून बोलेरो मॅक्स पिकप वाहन जप करण्यात आले आहे. पोलिसांनी दिलेल्या अधिक माहितीनुसार रविवार 28 जून रोजी परभणी शहरात पेट्रोलिंग सुरू असताना गुप्त बातमी दाना मार्फत माहिती मिळाली की पांढऱ्या रंगाची बोलोरो मॅक्स पिकप वाहनातून रेशनचा गहू व तांदूळ काळ्या बाजारात चढ्या भावाने विक्रीसाठी गंगाखेड येथील बाजारपेठेत नेण्यात येत आहे या माहितीच्या आधारे शिंगणापूर फाट्यासमोरील चैनल जवळील सार्वजनिक रस्त्यावर सापळा रचून संबंधित वाहन ताब्यात घेण्यात आले वाहनाची तपासणी केली असता त्यामध्ये 48 कट्टे गहू व 24 कट्टे तांदूळ आढळून आला. संबंधिताकडे धान्याची वाहतूक व विक्री बाबत कोणताही वैद्य परवाना नसल्यामुळे पंचनामा करून वाहनासह संपूर्ण मुद्देमाल जप्त करण्यात आला.

# परभणी शहर महानगरपालिका सहा जागांसाठी पाच उमेदवारांचे नामनिर्देशन

## स्वीकृत सदस्यासाठी अंबिका डहाळे विनोद कदम यांचे अर्ज दाखल

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी





**परभणी:** महानगरपालिका स्वीकृत सदस्य पदासाठी सोमवार 29 रोजी सहा जागेसाठी पाच उमेदवाराचे नामनिर्देशन करण्यात आले. त्यामध्ये शिवसेना उबाठा गटाकडून सौ अंबिका डहाळे तर काँग्रेस गटाकडून विनोद कदम यांचे अर्ज दाखल करण्यात आले आहेत सदस्य पदासाठी अर्ज करण्याकरिता सोमवार सकाळी 11 ते दुपारी एक वाजेपर्यंतची वेळ देण्यात आली होती विहित मुदतीत मनपा आयुक्ताकडे दोघांचे आज प्राप्त झाले आहेत महानगरपालिकेत स्वीकृत नगरसेवकांच्या सहा जागा असून पाच अर्ज आले आहेत शहर महानगरपालिका सभागृहात 65 नगरसेवक आहेत तर सहा स्वीकृत नगरसेवक निवडले शिवसेना उबाटा गटाच्या वाट्याला दोन तर काँग्रेस भाजपा राष्ट्रवादी काँग्रेस अप आणि शहर विकास आघाडीला प्रत्येकी एक जागा देण्यात आली आहे तर भाजपाकडून शिवाजी भरोसे राष्ट्रवादी काँग्रेस कडून शेख पाच शालीमार शहर विकास आघाडी कडून राहुल मुरकुटे त्यांचे अर्ज दाखल झाले आहेत. 29 जून सोमवार रोजी शिवसेनेकडून अंबिका डहाळे यांचा अर्ज आला आमदार डॉक्टर राहुल पाटील मनपा गटनेते दिलीप ठाकूर सभागृह नेते सय्यद समी उर्फ माजुलाला महानगर प्रमुख डॉक्टर विवेक नावंदर विकास राजापुरे अनिल डहाळे बाळराजे तळेकर नवनीत पाचपोर यांची उपस्थिती होती काँग्रेसकडून विनोद कदम यांनी आपले उमेदवारी अर्ज महापालिका आयुक्त नितीन नार्वेकर यांच्याकडे दाखल केला यावेळी गटनेते गुलमीर खान यांची उपस्थिती होती येत्या सर्वसाधारण सभेत या नावांना मंजुरी मिळण्याची शक्यता आहे यापूर्वी झालेल्या बैठकीत स्वीकृत नगरसेवक पदाच्या नावावर शिक्का मोर्तब झाले नव्हते. उबाटा. गटाला दोनजागा असून त्या पैकी एकच अर्ज दाखल झाल्याने खासदार संजय जाधव यांच्या गटाला एक जागा देण्यात येणार होती परंतु त्यांनी शिवसेना शिंदे गटात प्रवेश केल्यामुळे ही जागा रिक्त राहिली आहे या जागेकडे कोणाची वर्णी लागते याकडे सर्वांचेच लक्ष लागले आहे.

# संगीतमय सोहळा! कामगार कल्याण मंडळाचा ७३ वा वर्धापन दिन उत्साहात; उस्मानपुऱ्यात रंगणार 'स्वरधारा' संगीत रजनी

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाच्या छत्रपती संभाजीनगर विभागीय कार्यालयाच्या वतीने मंडळाच्या ७३ व्या वर्धापन दिनानिमित्त एका भव्य सांस्कृतिक आणि संगीत सोहळ्याचे आयोजन करण्यात आले आहे.

येत्या बुधवार, दि. १ जुलै रोजी शहरातील उस्मानपुरा भागातील ललित कला भवन येथे हा भरगच्च कार्यक्रम पार पडणार आहे. यामध्ये स्वागत समारंभासह रसिकांसाठी एका विशेष संगीत रजनीची सुरेल मेजवानी दिली जाणार आहे. या सोहळ्याचे मुख्य आकर्षण म्हणजे प्रसिद्ध निर्माता, गायक आणि संगीतकार मंगलसिंग सोळंके प्रस्तुत 'स्वरधारा' हा कार्यक्रम असेल. या सादरीकरणात जुन्या-नव्या सुमधुर मराठी आणि हिंदी गीतांचा नजराणा पेश केला जाणार असून, छत्रपती संभाजीनगरमधील संगीतप्रेमींसाठी ही एक सुवर्णपर्वणी ठरणार आहे. महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळ हे केवळ एक प्रशासकीय मंडळ नसून, ते गेल्या ७३ वर्षांपासून राज्यातील कामगार आणि त्यांच्या कुटुंबीयांच्या सामाजिक, आर्थिक आणि सांस्कृतिक प्रगतीचा मुख्य कणा राहिले आहे. कामगार बांधवांच्या जीवनमानाचा स्तर उंचावण्यासाठी आणि त्यांच्या पाल्यांना शिक्षणाच्या मुख्य प्रवाहात आणण्यासाठी मंडळ अनेक महत्त्वाच्या योजना राबवते. यामध्ये कामगारांच्या मुलांसाठी सर्वसाधारण, क्रीडा आणि परदेशी शिष्यवृत्ती दिली जाते.

याशिवाय पाठ्यपुस्तक खरेदी, एमएससीआयटी (MS-CIT), टायपिंग आणि चारचाकी वाहन चालक प्रशिक्षणासाठी विशेष आर्थिक मदत दिली जाते. तसेच कामगारांना किंवा त्यांच्या कुटुंबीयांना गंभीर आजार उद्भवल्यास वैद्यकीय उपचारांसाठी मंडळाकडून विशेष अर्थसाहाय्य योजना उपलब्ध आहे. क्रीडा व संस्कृतीची जोपासना करण्यासाठी औद्योगिक क्षेत्रातील कामगारांमधील कलागुणांना वाव देण्यासाठी भव्य कामगार नाट्य महोत्सव, बालनाट्य आणि महिला नाट्यस्पर्धांचे आयोजन केले जाते. तसेच समरगीत स्पर्धा, कामगार व महिलांसाठी भजन स्पर्धा आणि कुस्ती क्षेत्रातील मानाची 'कामगार केसरी' व 'कुमार केसरी' कुस्ती स्पर्धा, कबड्डी स्पर्धा अशा विविध खेळांचे आयोजन मंडळ सातत्याने करत असते. कामगार वस्त्यांमध्ये शिशुमंदिर, महिलांसाठी शिवणवर्ग, ग्रंथालय आणि विद्यार्थ्यांसाठी अभ्यासिका चालवल्या जातात. तसेच महिला आणि तरुणांना स्वावलंबी बनवण्यासाठी विविध प्रकारचे रोजगार-स्वयंरोजगार प्रशिक्षण कार्यक्रम घेतले जातात.

कामगार क्षेत्रात मैलाचा दगड ठरलेल्या या मंडळाच्या ७३ व्या वर्धापन दिनाचे औचित्य साधून आयोजित करण्यात आलेल्या या 'स्वरधारा' संगीत रजनीचा आणि स्वागत समारंभाचा लाभ छत्रपती संभाजीनगरमधील सर्व कामगार बांधवांनी, त्यांच्या कुटुंबीयांनी आणि सुजाण नागरिकांनी मोठ्या संख्येने उपस्थित राहून घ्यावा, असे आवाहन महाराष्ट्र कामगार कल्याण मंडळाचे मराठवाडा विभागीय सहायक कल्याण आयुक्त भालचंद्र जगदाळे यांनी केले आहे.

# शेतकऱ्याचे उत्पादन वाढवण्यासाठी अन्नप्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातील : केंद्रीय मंत्री चिराग पासवान

हिंदू प्रकाश वार्ता / प्रतिनिधी.

**परभणी:** भारत देशा हा शेती प्रधान देश असून देशाच्या उत्पन्नाचे मुख्य स्तोत्र शेती आहे शेतकऱ्यांचे उत्पन्न वाढवण्यासाठी अन्नप्रक्रिया उद्योगाच्या माध्यमातून सातत्याने प्रयत्न केले जातील शेतीचे उत्पन्न वाढवण्यासाठी प्रक्रिया उद्योग महत्त्वाचा असून त्याला आधिक चालना देण्याची आवश्यकता आहे. विकसित भारत घडवण्याची आपली प्रत्येकाची जबाबदारी आहे अन्नप्रक्रिया मंत्रालय उत्पादनापासून विक्रीपर्यंत सक्षमीकरणाच्या दृष्टीने विविध योजना राबवत असल्याचे प्रतिपादन केंद्रीय अन्न प्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान यांनी केले.

आत्मनिर्भर भारत अभियानांतर्गत केंद्र शासनाच्या अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालय नवी दिल्ली यांच्या आर्थिक साह्याने आणि मराठवाडा कृषी विद्यापीठ महाराष्ट्र शासन कृषी विभागाच्या राज्यस्तरीय नोडल संस्था यांच्या संयुक्त विद्यमाने अन्न तंत्र महाविद्यालय येथे उभारण्यात आलेल्या आधुनिक कॉमन इनक्यूब बेसन सेंटर इम्बुलेशन सेंटर चे उद्‌घाटन केंद्रीय अन्नप्रक्रिया उद्योग मंत्री चिराग पासवान यांच्या हस्ते दिनांक 28 जून रोजी रविवारी संपन्न झाले यावेळी जिल्ह्याचे पालकमंत्री मेघनाताई बोर्डीकर यांनी विशेष उपस्थिती होती कुलगुरू डॉ.प्रा. इंद्रमनी होते. यावेळी प्रमुख अतिथी खासदार रामराव वडकुते खासदार संजय जाधव उपस्थित होते महाराष्ट्र शासनाच्या कृषी प्रक्रिया नियोजन संचालक विनयकुमार आवटे जि प च्या सीईओ पोलीस अधीक्षक पंकज कुमार कुमावत शिक्षण संचालक डॉ भगवान असेवार आदी मान्यवराची विशेष उपस्थिती होती. कुलगुरू प्रा. डॉ. इंद्र मनी यांनी केंद्र शासनाच्या अन्नप्रक्रिया उद्योग मंत्रालयाच्या वतीने प्रधानमंत्री सुषमा अन्नप्रक्रिया उद्योग योजना ग्रामीण भागाच्या आर्थिक उन्नतीसाठी कारणीत करण्यात आली आहे. विद्यापीठाच्या अन्न तंत्र महाविद्यालयाच्या सुरू करण्यात आलेले कॉमन इन्क्युबेशन सेंटर हे उद्योजकता विकासासाठी समर्पित केंद्र असल्याचे सांगितले . प्रास्ताविक डॉक्टर भगवान असेवार केले अन्न तंत्र महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता डॉ. राजेश क्षीरसागर यांनी उपस्थितांचे आभार मानले सूत्रसंचालन डॉ. विना भालेराव आणि डॉ. रणजीत चव्हाण यांनी केले. विद्यापीठातील सर्व महाविद्यालयाचे सहयोगी अधिष्ठाता विभाग प्रमुख प्राध्यापक शास्त्रज्ञ योजनेचे लाभार्थी शेतकरी विद्यार्थी माजी विद्यार्थी तसेच उद्योजक मोठ्या उत्साहात या कार्यक्रमास सहभागी झाले होते.

# परभणीत चोरी गेलेल्या टिप्पर वाहनाचे तुकडे इतर सामान केले वाशिम मध्ये जप्त

हिंदू प्रकाश वार्ता प्रतिनिधी.

**परभणी:** शहरात दिवसेंदिवस वाहन चोरीचे प्रकरण घडत असतानाच . नवा मोंढा पोलीस ठाणे हद्दीतून एका टिप्पर ची चोरी करून टिप्पर चे तुकडे तुकडे करण्यात आले

स्थानिक गुन्हे शाखेच्या पथकाने वाशिम येथे कारवाई एका अज्ञात व्यक्तीला ताब्यात घेतले आहे तसेच टिप्पर चे तुकडे व इतर साहित्य जप्त केले आहे पुढील तपासासाठी आरोपीला नवा मुंडा पोलीस ठाण्यात हजर करण्यात आली आहे.

परभणी शहरातील नवा मोंढा पोलीस ठाणे हद्दीतून एक टिप्पर चोरी गेला होता याप्रकरणी गुन्ह्याची नोंद झाल्यानंतर तपासाची चक्रे वेगाने फिरवत टिप्पर वाशिम येथे असल्याची गुप्त माहिती मिळाली. मैफूज रहमान शेख रजाक, शेख नवीद शेख मकाजीत, सय्यद गुजरात यांनी वाहनाची चोरी केल्याचे समजले त्यानंतर स्थानिक गुन्हा शासकीय च्या पथकाने वाशिम येथे मैफूज रेहमान शेख रजाक याला ताब्यात घेतले त्याला पॉलिसी खाक्या दाखवताच त्याने साथीदारासोबत मिळून गुन्हा केल्याची कबुली दिली. तोडफोड करून वेगवेगळे सामान सामानाचे विविध भाग एका शेडमध्ये ठेवल्याची माहिती सांगितली. पोलिसांनी शेडमध्ये टिप्पर चे तुटलेले जप्त केले व आरोपी महफूज रहमान याला ताब्यात घेण्यात आले असून पुढील कारवाईसाठी नवा मुंडा पोलीस देण्यात हजर करण्यात आले आहे सदरची कारवाई स्थानिक गुना शाखेचे पोलीस अंमलदार दुधाटे, फड, कवठाळे भदर्गे, लटपटे, क्षीरसागर, ढगे,हनवते, यांच्या पथकाने केली

# वैजापूरात कंत्राटी अभियंता एसीबीच्या जाळ्यात!

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** प्रधानमंत्री आवास योजनेअंतर्गत मंजूर झालेल्या घरकुलाचा दुसरा हप्ता मिळवून देण्यासाठी, तसेच कामाची स्थळ पाहणी (जिओ टॅगिंग) करून फोटो अपलोड करण्यासाठी १,००० रुपयांची लाच स्वीकारताना एका कंत्राटी अभियंत्याला लाचलुचपत प्रतिबंधक विभागाने (ACB) रंगेहात पकडले आहे. ही कारवाई वैजापूर येथील पंचायत समिती कार्यालयात आज करण्यात आली. प्रवीण गायकवाड (ग्रामीण गृहनिर्माण अभियंता, कंत्राटी, ढवळा खंबाळा, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर) असे लाच घेताना पकडण्यात आलेल्या आरोपी लोकसेवकाचे नाव आहे. याप्रकरणी वैजापूर पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्याची प्रक्रिया सुरू करण्यात आली आहे. यातील तक्रारदार यांना प्रधानमंत्री आवास योजनेतून घरकुल मंजूर झाले होते. त्यांना पहिला हप्ता मिळालेला होता, तर दुसऱ्या ७५,००० रुपयांच्या हप्त्यासाठी कंत्राटी अभियंता प्रवीण गायकवाड याने कामाची पाहणी करून जिओ टॅगिंग करण्यासाठी आणि फोटो अपलोड करण्यासाठी १,००० रुपयांची लाच मागितली होती. तक्रारदाराची लाच देण्याची इच्छा नसल्याने त्यांनी याविषयी लाचलुचपत प्रतिबंधक विभाग, छत्रपती संभाजीनगर येथे प्रत्यक्ष येऊन रीतसर तक्रार नोंदवली. तक्रारीच्या अनुषंगाने दि. २५ जून रोजी एसीबीच्या पथकाने पडताळणी केली असता, आरोपी प्रवीण गायकवाड याने १,००० रुपयांची लाच मागितल्याचे आणि ती स्वीकारण्याचे मान्य केल्याचे निष्पन्न झाले. त्यानुसार आज, २९ जून रोजी वैजापूर पंचायत समिती कार्यालयात शासकीय पंचांसमक्ष सापळा कारवाई दरम्यान तक्रारदाराकडून १,००० रुपयांची लाच स्वीकारताना गायकवाड याला रंगेहात ताब्यात घेण्यात आले. आरोपीच्या घराची झडती घेण्याची प्रक्रिया सुरू आहे.

# राजर्षी शाहू महाराज जयंतीनिमित्त छत्रपती संभाजीनगरमध्ये जात वैधता प्रमाणपत्रासाठी विशेष मोहीम; 3 जुलैपर्यंत सुवर्णसंधी

हिंदू प्रकाशवार्ता/प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** राजर्षी शाहू महाराज यांच्या जयंतीचे औचित्य साधून जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांच्या वतीने इयत्ता ११ वी व १२ वी विज्ञान शाखेतील मागासवर्गीय विद्यार्थ्यांसाठी जात वैधता प्रमाणपत्र मिळवून देण्यासाठी विशेष मोहिमेचे आयोजन करण्यात आले आहे. ही मोहीम दिनांक २६ जून २०२६ ते ३ जुलै २०२६ या कालावधीत राबवली जाणार आहे. शैक्षणिक वर्ष २०२६-२७ मध्ये ११ वी व १२ वी विज्ञान शाखेत प्रवेश घेतलेले आणि १२ वी नंतर अभियांत्रिकी, वैद्यकीय, कृषी, पशुसंवर्धन, विधी यांसारख्या व्यावसायिक अभ्यासक्रमांना प्रवेश घेऊ इच्छिणारे विद्यार्थी या मोहिमेचा लाभ घेऊ शकतात. यामध्ये अनुसूचित जाती (SC), विमुक्त जाती (VJ), भटक्या जमाती (NT), इतर मागासवर्ग (OBC), विशेष मागास प्रवर्ग (SBC) आणि सामाजिक व शैक्षणिकदृष्ट्या मागास (SEBC) प्रवर्गातील ज्या विद्यार्थ्यांनी अद्याप जात वैधता प्रमाणपत्रासाठी अर्ज केलेले नाहीत, अशा सर्व विद्यार्थ्यांसाठी ही सुवर्णसंधी उपलब्ध करून देण्यात आली आहे. या मोहिमेचा लाभ घेण्यासाठी इच्छुक विद्यार्थ्यांनी सर्वप्रथम **https://ccvis.barti.in** या अधिकृत संकेतस्थळावर ऑनलाईन अर्ज सादर करणे आवश्यक आहे. ऑनलाईन अर्ज भरल्यानंतर त्याची प्रिंट काढून, त्यासोबत आवश्यक असणाऱ्या सर्व कागदपत्रांच्या साक्षांकित (Self-attested) प्रती जोडणे बंधनकारक आहे. सदर कागदपत्रांचा संच तत्काळ जिल्हा जात प्रमाणपत्र पडताळणी समिती, छत्रपती संभाजीनगर यांच्या कार्यालयात जमा करावा लागणार आहे. प्रवेश प्रक्रियेदरम्यान विद्यार्थ्यांची गैरसोय होऊ नये म्हणून या विशेष मोहिमेंतर्गत प्राप्त झालेल्या अर्जांवर समितीकडून तातडीने कार्यवाही केली जाईल. तसेच, छाननीअंती पात्र ठरणाऱ्या संबंधित विद्यार्थ्यांना ऑनलाईन पद्धतीने जात वैधता प्रमाणपत्र निर्गमित केले जाणार आहे. ऐनवेळी होणारी धावपळ आणि शैक्षणिक नुकसान टाळण्यासाठी पात्र विद्यार्थ्यांनी या विशेष मोहिमेचा जास्तीत जास्त लाभ घ्यावा, असे आवाहन जिल्हा जात पडताळणी समितीचे डॉ. दीपक खरात यांनी प्रसिद्धी पत्रकाद्वारे केले आहे.

# 'स्पेस ऑन व्हील्स'ने विद्यार्थ्यांना दाखवली अंतराळाची सफर

## 'वैज्ञानिक दृष्टिकोन जोपासून इस्रोचे शास्त्रज्ञ व्हा' – मान्यवरांचे आवाहन

हिंदू प्रकाशवार्ता :प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** भारतीय अंतराळ संशोधन संस्था (इस्रो) आणि विज्ञान भारती यांच्या संयुक्त विद्यमाने आयोजित 'स्पेस ऑन व्हील्स' या फिरत्या अंतराळ विज्ञान प्रदर्शनाला सोमवारी छत्रपती संभाजीनगरातील एस. बी. हायस्कूलमध्ये विद्यार्थ्यांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. अंतराळ विज्ञानाची प्रत्यक्ष ओळख करून देणाऱ्या या प्रदर्शनातून विद्यार्थ्यांमध्ये वैज्ञानिक दृष्टिकोन, संशोधनाची आवड आणि नवोपक्रमाची प्रेरणा निर्माण करण्याचा प्रयत्न करण्यात आला.

कार्यक्रमाचे उद्‌घाटन इस्रोचे निवृत्त वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जी. श्रीनिवास राव, विज्ञान भारतीचे राष्ट्रीय संघटन मंत्री डॉ. शिवकुमार शर्मा, राष्ट्रीय सहसंघटन मंत्री प्रवीण रामदास, एस. बी. शिक्षण संस्थेच्या संयुक्त सचिव डॉ. रश्मी बोरिकर, शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर आणि उद्योजक सुनील विनोदराय रायठट्टा यांच्या उपस्थितीत दीपप्रज्वलनाने झाले.

प्रास्ताविकात प्रवीण रामदास यांनी भारतीय ज्ञानपरंपरा आणि आधुनिक विज्ञान यांचा समन्वय साधण्याची आवश्यकता अधोरेखित केली. विज्ञान हे केवळ प्रयोगशाळेपुरते मर्यादित नसून समाजपरिवर्तनाचे प्रभावी माध्यम असल्याचे त्यांनी सांगितले.

इस्रोचे वरिष्ठ शास्त्रज्ञ डॉ. जी. श्रीनिवास राव यांनी भारताच्या अंतराळ प्रवासाचा प्रेरणादायी आढावा घेताना मंगळयान, चांद्रयान, आदित्य-L1, गगनयान, स्पेस डॉकिंग तंत्रज्ञान आणि भारतीय अंतराळ स्थानक यांसारख्या महत्त्वाकांक्षी मोहिमांची माहिती दिली. संसाधने मर्यादित असली तरी जिद्द, संशोधन आणि नवोपक्रमाच्या बळावर भारताने जगात वेगळी ओळख निर्माण केल्याचे सांगत विद्यार्थ्यांनी जिज्ञासू वृत्ती जोपासून इस्रोमध्ये करिअर करण्याचे ध्येय ठेवावे, असे आवाहन त्यांनी केले.

डॉ. रश्मी बोरिकर यांनी विज्ञान व संशोधन क्षेत्रात मोठी स्वप्ने पाहण्याचा संदेश दिला. तर डॉ. शिवकुमार शर्मा यांनी विज्ञान ही केवळ विषयांची शाखा नसून जीवनाकडे पाहण्याची विचारसरणी असल्याचे सांगत प्रत्येक गोष्टीमागील कारण शोधण्याची आणि प्रश्न विचारण्याची सवय विद्यार्थ्यांनी लावावी, असे मार्गदर्शन केले.

शिक्षणाधिकारी अश्विनी लाठकर यांनी प्रदर्शनातील प्रत्येक मॉडेल, उपग्रह आणि रॉकेट प्रणाली समजून घेण्याचे आवाहन करत भविष्यात इस्रोसारख्या राष्ट्रीय संस्थांमध्ये कार्य करण्याचे ध्येय विद्यार्थ्यांनी ठेवावे, असे सांगितले.

यावेळी मान्यवरांच्या हस्ते 'स्पेस ऑन व्हील्स' बसचे उद्‌घाटन करण्यात आले. त्यानंतर विद्यार्थ्यांनी उपग्रह तंत्रज्ञान, रॉकेट प्रणाली, अंतराळ संशोधन आणि आधुनिक वैज्ञानिक संकल्पनांवरील विविध मॉडेल्सची माहिती मोठ्या उत्साहाने जाणून घेतली. तसेच विद्यार्थी विज्ञान मंथन (VVM) विषयी अमोल कुंभळकर यांनी मार्गदर्शन केले.

कार्यक्रमाचे सूत्रसंचालन डॉ. अरुणा म्हारोलकर यांनी केले, तर आभार प्रदर्शन सुनील विनोदराय रायठट्टा यांनी केले.

# मराठवाड्यातील सेवा संस्थांचा स्नेह मेळावा 11 जुलैला

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** मराठवाडा विभागातील सामाजिक, शैक्षणिक, आरोग्य, ग्रामीण विकास तसेच विविध क्षेत्रांत कार्यरत सेवा संस्थांचा परस्पर परिचय व्हावा, अनुभवांची देवाणघेवाण घडावी आणि सेवा कार्याचे सशक्त नेटवर्क निर्माण व्हावे, या उद्देशाने 'मराठवाडा सेवा संस्था स्नेह मेळावा'चे आयोजन करण्यात आले आहे.

ग्रामायण प्रतिष्ठानच्या वतीने आयोजित हा मेळावा शनिवार, दि. ११ जुलै रोजी सकाळी १०.३० ते सायंकाळी ५ वाजेपर्यंत छत्रपती संभाजीनगर येथे होणार आहे. सन २०१२ पासून सामाजिक व ग्रामीण विकास क्षेत्रात कार्यरत असलेल्या ग्रामायण प्रतिष्ठानने या उपक्रमाची जबाबदारी स्वीकारली आहे.

मेळाव्यात मराठवाड्यातील निवडक सेवा संस्थांच्या कार्याचे सादरीकरण होणार असून, स्वयंसेवी संस्थांसमोरील प्रश्न, आव्हाने, त्यावरील उपाययोजना तसेच परस्पर सहकार्याच्या विविध संधींवर चर्चा केली जाणार आहे. सेवा कार्य अधिक प्रभावी करण्यासाठी राबविता येणाऱ्या उपक्रमांवरही सखोल विचारमंथन होणार आहे.

मराठवाड्यातील सर्व सेवा संस्थांनी या मेळाव्यात सहभागी व्हावे, असे आवाहन आयोजकांनी केले आहे. प्रत्येक संस्थेतून जास्तीत जास्त दोन प्रतिनिधींना सहभागी होता येणार असून, सहभाग पूर्णपणे निःशुल्क आहे.

मेळावा सावित्रीबाई फुले महिला एकात्म समाज मंडळ, ओंकार शैक्षणिक संकुल, गट क्रमांक ४४, कमलनयन बजाज हॉस्पिटलच्या मागे, बीड बायपास रस्ता, छत्रपती संभाजीनगर येथील दुसऱ्या मजल्यावरील सभागृहात होणार आहे.

सहभागासाठी आयोजकांनी उपलब्ध करून दिलेला गुगल फॉर्म भरून नोंदणी करावी, असे आवाहन करण्यात आले आहे. अधिक माहितीसाठी शिरीष कुलकर्णी (९८२२० ४५३४६), शंतनु पुराणकर (९५५२५ ६९८४५), पंडित घुगे (९५४५११९११९), मनोज शेवाळे (९८२३० ६८२३०) आणि पद्मश्री केंडे यांच्याशी संपर्क साधावा.

# रुग्णसेवेसाठी सरसावले मेकॅनिक; घाटी व कर्करोग रुग्णालयात साहित्य दुरुस्तीचा उपक्रम

## औरंगाबाद टु व्हिलर मेकॅनिक असोसिएशनच्या मदतयज्ञात वाळूज, लासूर, शिऊर व मनुर येथील मेकॅनिकांचा सहभाग

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** गॅरेजमध्ये वाहनांची दुरुस्ती करणारे हात आता रुग्णसेवेसाठी पुढे सरसावले आहेत. औरंगाबाद टु व्हिलर मेकॅनिक असोसिएशनच्या वतीने ५ जूनपासून घाटी रुग्णालय, कर्करोग रुग्णालय आणि मेडिसिन विभागात विविध रुग्णोपयोगी साहित्याची दुरुस्ती करण्याचा मदतयज्ञ अखंड सुरू आहे.

शासकीय वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाचे अधिष्ठाता डॉ. शिवाजी सुक्रे आणि कर्करोग रुग्णालयाचे विशेष कार्य अधिकारी डॉ. अरविंद गायकवाड यांच्या मार्गदर्शनाखाली जिल्हा संघटनेचे संस्थापक अध्यक्ष सय्यद चांद यांच्या नेतृत्वाखाली हा उपक्रम राबविण्यात येत आहे.

कर्करोग रुग्णालय आणि आमखास मैदान परिसरात मेडिसिन ट्रॉली, खुर्च्या, स्टूल यांची वेल्डिंग व नट-बोल्टद्वारे दुरुस्ती करण्यात आली. या सेवाभावी कार्याबद्दल डॉ. अरविंद गायकवाड यांनी संघटनेच्या निष्काम सेवाभावाचे कौतुक केले.

यावेळी लासूर स्टेशन टु व्हिलर मेकॅनिक संघटनेचे अध्यक्ष संजय त्रिभुवन, उपाध्यक्ष चंद्रशेखर औताडे, भाऊसाहेब जाधव, भारत सुरासे, शरद बनकर, जिल्हा उपाध्यक्ष शेख नुर आदी उपस्थित होते.





दुसऱ्या सत्रात औरंगाबाद टु व्हिलर मेकॅनिक असोसिएशन व वाळूज एमआयडीसी टु व्हिलर मेकॅनिक असोसिएशनच्या सदस्यांनी कर्करोग रुग्णालयातील २३ खुर्च्या, २ स्ट्रेचर, ४ व्हिलचेअर आणि ६ स्टूलची दुरुस्ती केली. या उपक्रमात वाळूज एमआयडीसी संघटनेचे अध्यक्ष उद्धव पवार, उपाध्यक्ष संजय यादव, बापू कराळे, कैलास पवार तसेच शेख नुर यांनी सहभाग घेतला.

याशिवाय महाराष्ट्र इंजिनिअरिंग वर्क्स, पैठण गेटचे मालक शेख जाफर शेख हबीब यांनी संघटनेला वेल्डिंग मशीन भेट देऊन उपक्रमाला हातभार लावला.

मेडिसिन विभागातील वॉर्ड क्रमांक ८ मध्ये २ स्ट्रेचर, ३ रुग्णबेड आणि २ व्हिलचेअरची दुरुस्ती करण्यात आली. तसेच वॉर्ड क्रमांक ३७ मध्ये ८ रुग्णबेड, १ व्हिलचेअर आणि १ स्टूलची दुरुस्ती शिऊर, मनुर व परिसरातील मेकॅनिक संघटनेच्या सदस्यांनी केली.

या वेळी विभागप्रमुख संतोष दवंगे, रमेश गवळी, पंडित, शेख समीर तसेच औरंगाबाद टु व्हिलर मेकॅनिक असोसिएशनचे उपाध्यक्ष शेख मुन्ना, शेख नुर आणि विभागप्रमुख शेख जमीरभाई आदी उपस्थित होते. रुग्णालयातील रुग्णोपयोगी साहित्य कार्यक्षम ठेवण्यासाठी मेकॅनिकांनी हाती घेतलेल्या या सेवाभावी उपक्रमाचे सर्व स्तरांतून कौतुक होत आहे.

# वेरूळ येथील मोठे खड्डे अखेर सामाजिक कार्यकर्ते यांच्या स्वखर्चातून मसियोदिन सौदागर यांच्याकडून दुरुस्ती

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

छत्रपती संभाजी नगर जिल्हा प्रतिनिधी पर्यटन स्थळ म्हणून .व तीर्थक्षेत्र म्हणून ओळख असलेल्या वेरूळ तालुका खुलताबाद जिल्हा छत्रपती संभाजी नगर येथील उड्डाणपुला च्या खालून कन्नड मार्गाकडे जाणाऱ्या वळणावर पडलेल्या जीवघेण्या मोठे मोठे खड्ड्यांमुळे येणाऱ्या जाणाऱ्या वाहनधारकांना मोठ्या त्रासाला सामोरे जावे लागत



होते या खड्ड्यांत आदळून अनेक चारचाकी व दोन चाकी वाहनांचे मोठे नुकसान होत होते, तसेच पावसाचे पाणी या ठिकाणी साचल्यामुळे अपघाताचा धोकाही वाढला होता. वेळीच दखल घेत वेरूळ येथील स्थानिक सामाजिक कार्यकर्ते मसियोदिन सौदागर यांनी स्वतःहून पुढाकार घेऊन स्वतःच्या खर्चाने खडी व मुरूम टाकून जेसीबीच्या साह्याने लेवल करून सामाजिक बांधिलकी दाखवून दिली.

मसियोदिन सौदागर यांनी दाखवलेल्या या सामाजिक भान आणि तत्परतेमुळे या मार्गावरील वाहतूक आता सुरक्षित व सुरळीत झाली आहे. यांचा आदर्श घेऊन मोठा गाजावाजा करणारे वेरूळ या ठिकाणी येणाऱ्या मोठमोठे राजकीय पुढारी कोटी रुपयाचे कामाची घोषणा करतात परंतु या मूलभूत सुविधेकडे स्थानिक राजकीय नेत्यांना काही देणं घेणं नसल्याचे शोकांतिका दिसून येते

# जिल्ह्यात 95 टक्के उद्दिष्ट पूर्ण; एकही बालक पोलिओच्या दोन थेंबांपासून वंचित राहू नये – मुख्य कार्यकारी अधिकारी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी


**छत्रपती संभाजीनगर :** राष्ट्रीय पल्स पोलिओ लसीकरण मोहिमेंतर्गत जिल्ह्यात सुमारे ९५ टक्के उद्दिष्ट पूर्ण झाले असून, उर्वरित ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांपर्यंत पोलिओ लसीचे दोन थेंब पोहोचावेत यासाठी मंगळवार (दि. ३० जून) पासून २ जुलैपर्यंत विशेष घरोघरी सर्वेक्षण मोहीम राबविण्यात येणार आहे.

या मोहिमेत आरोग्य विभागाचे कर्मचारी, आशा स्वयंसेविका आणि अंगणवाडी सेविका प्रत्येक घराला भेट देऊन ० ते ५ वर्षे वयोगटातील बालकांना पोलिओ लसीचा डोस मिळाला आहे का, याची खातरजमा करतील. लसीकरणापासून वंचित राहिलेल्या बालकांना तत्काळ पोलिओ लसीचे दोन थेंब देण्यात येणार आहेत.

जिल्हा परिषदेचे मुख्य कार्यकारी अधिकारी यांनी जिल्ह्यातील सर्व पालकांना आवाहन केले आहे की, आरोग्य कर्मचाऱ्यांना पूर्ण सहकार्य करावे आणि आपल्या परिसरातील एकही बालक पोलिओ लसीच्या दोन थेंबांपासून वंचित राहणार नाही, याची दक्षता घ्यावी.

# पेरणी करताना अंधारीमध्ये शेतकऱ्यावर वीज कोसळून जागीच मृत्यू, कुटुंबाचा आधार हरपला

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी



**अंधारी दि.29 :** पेरणीदरम्यान अंगावर वीज कोसळून ६५ वर्षीय शेतकऱ्याचा जागीच मृत्यू; अंधारी परिसरात शोककळा, कुटुंबावर दुःखाचा डोंगर कोसळला,

सिल्लोड तालुक्यातील अंधारी येथील झाडी वस्ती शिवारातील शेतात पेरणीचे काम करत असताना अंगावर वीज पडून एका ६५ वर्षीय शेतकऱ्याचा जागीच मृत्यू झाल्याची हृदयद्रावक घटना घडली आहे. सर्जेराव देवराव खराते, असे या मृत शेतकऱ्याचे नाव आहे. मिळालेल्या माहितीनुसार, सोमवारी (ता.२९) दुपारी तीनच्या सुमारास परिसरात पावसाळी वातावरण असताना सर्जेराव खराते हे झाडी वस्ती शिवारातील शेतात पेरणीच्या कामात व्यस्त होते. दरम्यान, अचानक वीज कोसळल्याने त्यांचा दुर्दैवी मृत्यू झाला. त्यांच्यावर सिल्लोड येथील उपजिल्हा रुग्णालयात शवविच्छेदन करून मृतदेह नातेवाईकांच्या स्वाधीन करण्यात आला. या घटनेमुळे खराते कुटुंबीयांवर दुःखाचा मोठा डोंगर कोसळला असून, संपूर्ण अंधारी परिसरात शोककळा पसरली आहे. सायंकाळी सहाच्या सुमारास अंधारी येथील स्मशानभूमीत त्यांच्यावर अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या मागे पत्नी एक मुलगा दोन मुली असा परिवार आहेत.शासनाने तात्काळ मदत करावी, सर्जेराव खराते हे कुटुंबातील मुख्य आधारस्तंभ होते. त्यांच्या निधनामुळे कुटुंबाचे मोठे नुकसान झाले आहे. त्यामुळे शासनाने या दुर्दैवी कुटुंबाला तात्काळ आर्थिक मदत जाहीर करावी, अशी मागणी ग्रामस्थ आणि नातेवाईकांकडून करण्यात येत आहे.

# एमजीएमच्या सर्वरोग निदान शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद

## पिसादेवी येथे 150 रुग्णांची मोफत आरोग्य तपासणी; तज्ज्ञ डॉक्टरांकडून उपचार व मार्गदर्शन

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या कम्युनिटी मेडिसिन विभागातर्फे पिसादेवी ग्रामपंचायत येथे आयोजित सर्वरोग निदान व मोफत आरोग्य तपासणी शिबिरास ग्रामस्थांचा उत्स्फूर्त प्रतिसाद मिळाला. शिबिरामध्ये एकूण १५० रुग्णांची विविध आजारांसाठी तपासणी करण्यात आली.

शिबिरात नेत्ररोग, मेडिसिन, कान-नाक-घसा (ईएनटी), बालरोग, स्त्रीरोग व प्रसूती तसेच अस्थिरोग (ऑर्थोपेडिक) विभागातील तज्ज्ञ डॉक्टरांनी रुग्णांची तपासणी करून आवश्यक वैद्यकीय सल्ला दिला.



अधिक उपचारांची गरज असलेल्या रुग्णांना पुढील तपासणी व उपचारासाठी एमजीएम रुग्णालयात बोलावण्यात आले.

यावेळी डॉ. सुजाता, डॉ. अकिष्ठा, डॉ. दलाल, डॉ. पाटील, डॉ. फिके, सेवलीकर, पठाण, उधगटा, पिसादेवीचे सरपंच काळे, डॉ. श्रद्धा जयभार, प्राथमिक आरोग्य केंद्र वाळूजचे वैद्यकीय अधिकारी डॉ. काटकर यांच्यासह एमजीएम रुग्णालयातील विविध विभागांचे डॉक्टर, आरोग्य कर्मचारी आणि कम्युनिटी मेडिसिन विभागाचे कर्मचारी उपस्थित होते.

ग्रामीण भागातील नागरिकांना त्यांच्या गावातच दर्जेदार आरोग्य सेवा उपलब्ध करून देण्याच्या उद्देशाने आयोजित करण्यात आलेल्या या शिबिराचा मोठ्या संख्येने नागरिकांनी लाभ घेतला. शिबिराच्या यशस्वी आयोजनासाठी ग्रामपंचायत पिसादेवी, प्राथमिक आरोग्य केंद्र वाळूज तसेच एमजीएम वैद्यकीय महाविद्यालय व रुग्णालयाच्या सर्व संबंधित विभागांनी सहकार्य केले.


# महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्यांवर डल्ला टाकणारा सराईत जेरबंद

## गुन्हे शाखेची धडक कारवाई; 3.95 लाखांचा मुद्देमाल जप्त, उस्मानपुरा व क्रांती चौक परिसरातील दोन गुन्ह्यांची उकल

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** शहरात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या आणि मंगळसूत्र हिसकावून दहशत निर्माण करणाऱ्या सराईत आरोपीला गुन्हे शाखेने अटक करत दोन गुन्ह्यांची उकल केली आहे. आरोपीकडून चोरीतील सोन्याचे दागिने, गुन्ह्यात वापरलेली दुचाकी आणि इतर साहित्य असा ३ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

अटक करण्यात आलेल्या आरोपीचे नाव अमोल बालाजी बाराटे (वय २९, रा. बन्सीलाल नगर, छत्रपती संभाजीनगर) असे आहे.





२६ जून रोजी उस्मानपुरा परिसरातील रहिवासी सुनिता गिरीष सांगवीकर (वय ६६) या श्रेयनगर येथील स्वाध्याय कार्यक्रम आटोपून घरी परतत असताना समर्थ ऑप्टिकलजवळ रस्ता ओलांडत होत्या. त्याचवेळी काळ्या रंगाच्या टीव्हीएस ज्युपिटरवर आलेल्या एका तरुणाने त्यांच्या गळ्यातील सुमारे २० ग्रॅम वजनाची सोन्याची साखळी हिसकावून क्षणार्धात पलायन केले. याप्रकरणी उस्मानपुरा पोलीस ठाण्यात गुन्हा दाखल करण्यात आला होता. याशिवाय क्रांती चौक पोलीस ठाण्याच्या हद्दीतही अशाच प्रकारचा





गुन्हा दाखल होता. या दोन्ही गुन्ह्यांचा समांतर तपास सुरू असताना पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाथरकर यांच्या पथकाने घटनास्थळांवरील सीसीटीव्ही फुटेज, तांत्रिक विश्लेषण आणि गोपनीय माहितीच्या आधारे आरोपीचा माग काढला. समर्थनगर परिसरात विनानंबरच्या टीव्हीएस ज्युपिटरवर पुन्हा गुन्हा करण्याच्या तयारीत असताना पोलिसांनी सापळा रचून त्याला ताब्यात घेतले. सुरुवातीला आरोपीने उडवाउडवीची उत्तरे दिली. मात्र, कसून चौकशी केल्यानंतर त्याने उस्मानपुरा आणि क्रांती चौक परिसरात महिलांच्या गळ्यातील सोनसाखळ्या हिसकावल्याची कबुली दिली.

पोलिसांनी आरोपीकडून गुन्ह्यात वापरलेली टीव्हीएस ज्युपिटर मोपेड, काळे जॅकेट, हाफ पँट, रुमाल, गॉगल तसेच सोनाराकडे विकलेले ३ लाख ३५ हजार रुपयांचे सोन्याचे दागिने जप्त केले. वाहनासह एकूण ३ लाख ९५ हजार रुपयांचा मुद्देमाल हस्तगत करण्यात आला. या कारवाईमुळे उस्मानपुरा पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक १६३/२०२६ आणि क्रांती चौक पोलीस ठाण्यातील गुन्हा क्रमांक २१२/२०२६ या दोन गुन्ह्यांची उकल झाली असून आरोपीला पुढील तपासासाठी उस्मानपुरा पोलिसांच्या ताब्यात देण्यात आले आहे.

पोलीस आयुक्त प्रवीण पवार, पोलीस उपायुक्त (गुन्हे) शशिकांत सातव आणि सहाय्यक पोलीस आयुक्त अशोक राजपूत यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस निरीक्षक गजानन कल्याणकर, पोलीस उपनिरीक्षक प्रवीण पाथरकर तसेच गुन्हे शाखेच्या पथकाने ही उल्लेखनीय कारवाई केली.

# वटपौर्णिमेच्या निमित्ताने विघ्नहर्ता गणेश मंदिरात श्रद्धेचा साज; सुवासिनींची दिवसभर लगबग

## वडपूजन, ओटी भरणे आणि वाणवसा परंपरेने मंदिर परिसर भक्तिमय वातावरणाने फुलला

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**छत्रपती संभाजीनगर :** वटपौर्णिमेच्या निमित्ताने सिडकोतील एन-३ परिसरातील विघ्नहर्ता गणेश मंदिर सोमवारी दिवसभर सुवासिनींच्या उपस्थितीने गजबजून गेले. शुभमुहूर्त असल्याने सकाळपासूनच एन-३ व एन-४ परिसरातील महिलांनी मंदिरात गर्दी करत वडाच्या वृक्षाची पारंपरिक पद्धतीने पूजा-अर्चा केली. धार्मिक विधींसह पारंपरिक संस्कृतीचे दर्शन घडविणारा हा सोहळा दिवसभर रंगला.

मंदिराचे पुजारी पांडुरंग जोशी यांनी उपस्थित महिलांना विधीवत वटपूजन करून घेतले. महिलांनी



वडाच्या वृक्षाची पूजा, प्रदक्षिणा, नैवेद्य आणि आरती करून कुटुंबाच्या सुख-समृद्धीसाठी तसेच पतीच्या दीर्घायुष्यासाठी प्रार्थना केली. मंत्रोच्चार आणि भक्तिभावामुळे मंदिर परिसरात प्रसन्न व आध्यात्मिक वातावरण निर्माण झाले.

पूजेनंतर महिलांनी पारंपरिक पद्धतीने एकमेकींची ओटी भरली पारंपरिक वेशभूषेत सहभागी झालेल्या महिलांमुळे मंदिर परिसराला उत्सवी स्वरूप प्राप्त झाले. सकाळपासून सायंकाळपर्यंत भाविकांची ये-जा सुरू असल्याने मंदिर परिसरात चैतन्याचे वातावरण अनुभवायला मिळाले.

श्रद्धा, परंपरा आणि सामाजिक सलोखा यांचा सुंदर संगम घडविणारा हा वटपौर्णिमा सोहळा परिसरातील महिलांसाठी विशेष आकर्षण ठरला.

# अजिंठा घाटात पिकअप डोंगराच्या कड्यावर आदळली; क्लिनर जखमी

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**फर्दापूर, दि. २९ :** छत्रपती संभाजीनगर–जळगाव महामार्गावरील अजिंठा घाटात सोमवारी सायंकाळी साडेपाच वाजण्याच्या सुमारास पिकअप वाहनावरील चालकाचे नियंत्रण सुटल्याने वाहन डोंगराच्या कड्यावर जाऊन आदळल्याची घटना घडली. या अपघातात क्लिनर जखमी झाला असून वाहनाचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे.





मिळालेल्या माहितीनुसार, पिकअप क्रमांक एमएच ०५ बीएच ३३९५ हे वाहन अजिंठा घाट उतरत असताना चालकाचे वाहनावरील नियंत्रण सुटले. त्यामुळे वाहन थेट रस्त्यालगतच्या डोंगराच्या कड्यावर जाऊन आदळले. अपघाताची तीव्रता इतकी होती की, वाहनाची केबीन पूर्णपणे तुटून वाहनाचे मोठे नुकसान झाले.

या अपघातात वाहनातील क्लिनरच्या डोक्याला दुखापत झाली. जखमीला तातडीने फर्दापूर येथील खासगी रुग्णालयात उपचारासाठी दाखल करण्यात आले. त्याची प्रकृती स्थिर असल्याचे समजते.

घटनेची माहिती मिळताच फर्दापूर पोलीस ठाण्याचे सहाय्यक पोलीस निरीक्षक सुधीर मोटे यांच्या मार्गदर्शनाखाली पोलीस कर्मचारी फिरोज तडवी यांनी घटनास्थळी धाव घेतली. त्यांनी जखमी व्यक्तीला मदत करून वाहन आणि जखमीला घाटातून सुरक्षितरीत्या खाली आणले.

अजिंठा घाटातील वळणदार रस्ता आणि उतारामुळे वारंवार अपघाताच्या घटना घडत असल्याने वाहनचालकांनी सावधगिरी बाळगून वाहन चालविण्याचे आवाहन करण्यात येत आहे.

# शिवना येथे 103 गरजू लाभार्थ्यांना पेन्शन मंजुरीपत्रांचे वाटप; शेख सलीम यांच्या यश

हिंदू प्रकाशवार्ता : प्रतिनिधी

**अजिंठा :** सिल्लोड तालुक्यातील शिवना येथे सोमवार, दि. २९ जून २०२६ रोजी शिवसेना (शिंदे गट) पंचायत समिती सदस्य शेख सलीम भैया यांच्या जनसंपर्क कार्यालयात श्रावणबाळ सेवा राज्य निवृत्ती वेतन योजना, इंदिरा गांधी राष्ट्रीय वृद्धापकाळ पेन्शन योजना तसेच निराधार पेन्शन योजनेंतर्गत पात्र ठरलेल्या १०३ लाभार्थ्यांना मंजुरी प्रमाणपत्रांचे वितरण मोठ्या उत्साहात करण्यात आले.

गोरगरीब, ज्येष्ठ नागरिक, निराधार आणि सर्वसामान्य नागरिकांना शासनाच्या



लोककल्याणकारी योजनांचा लाभ वेळेत मिळावा यासाठी सातत्याने पाठपुरावा करणारे पंचायत समिती सदस्य शेख सलीम भैया यांच्या प्रयत्नांना या मंजुरीद्वारे मोठे यश मिळाले. अनेक दिवसांपासून प्रलंबित असलेल्या प्रस्तावांना मंजुरी मिळाल्याने लाभार्थ्यांनी समाधान व्यक्त करत शेख सलीम भैया यांचे आभार मानले.

या कार्यक्रमात जिल्हा परिषद सदस्य निकिता राजेंद्र काळे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे उपसभापती पप्पू राऊत, शिवना ग्रामपंचायतीचे सरपंच डॉ. सलमान खान, ग्रामपंचायत सदस्य विनायक काटकर, विनोद जगताप, खुराम चाऊस, शामराव होळकर, शेख राजीक, शेठ इम्रान मोमीन, विठ्ठल राऊत यांच्या हस्ते लाभार्थ्यांना मंजुरी प्रमाणपत्रांचे वाटप करण्यात आले.

यावेळी उपस्थित मान्यवरांनी शासनाच्या विविध योजना प्रत्येक पात्र नागरिकापर्यंत पोहोचविण्यासाठी लोकप्रतिनिधींनी सातत्याने प्रयत्न करणे आवश्यक असल्याचे मत व्यक्त केले. तसेच भविष्यातही अशाच प्रकारे पात्र लाभार्थ्यांना शासनाच्या सर्व योजनांचा लाभ मिळवून देण्यासाठी कटिबद्ध राहणार असल्याचे सांगितले.

कार्यक्रमास शिवसेना पदाधिकारी, कार्यकर्ते, ग्रामपंचायत सदस्य, ग्रामस्थ तसेच मोठ्या संख्येने लाभार्थी उपस्थित होते. मंजुरीपत्र मिळाल्याने लाभार्थ्यांच्या चेहऱ्यावर समाधान आणि आनंदाचे भाव पाहायला मिळाले.

"सर्वसामान्यांच्या सेवेसाठी सदैव तत्पर" या भूमिकेतून शेख सलीम भैया यांच्या माध्यमातून शिवना परिसरातील अनेक गरजू नागरिकांना विविध शासकीय योजनांचा लाभ मिळत असून, हा उपक्रम त्यांच्या जनसेवेतील आणखी एक महत्त्वाचा टप्पा ठरला आहे.

**मुख्य कार्यालय : ऑफिस नं. 515, 5 वा मजला, वास्तू इलाईट स्क्वेअर, बजाज हॉस्पिटल समोर, बीड बायपास रोड, छत्रपती संभाजीनगर- 431010**

हे पत्र प्रकाशक, मालक श्री. रोहित विकास पाटील यांनी मुद्रक श्री. सय्यद परवेझ अहेमद सय्यद इनायत अली यांच्यामार्फत रेड प्रिंटस् , सी-15, संजयनगर, बायजीपुरा, छत्रपती संभाजीनगर-431001 येथे छापून तिरुपती सुप्रीम एन्क्लेव्ह, जालान नगर, छत्रपती संभाजीनगर- 431001 येथून प्रकाशित केले. ▌संपादक : रोहित विकास पाटील ▌email : hinduprakashvarta@gmail.com ▌epaper.hinduprakashwarta.com ▌PRGI No.: MHMAR/25/A2358 ▌संपर्क क्र. : 7261999911